



दैनिक **आरंभपर्व**

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





• वर्ष : ०३ • अंक : ०८९ • पुणे • गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313




भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन 'किसान' सुरु

3



पुणे भाजपमध्ये इच्छुकांची लगबग

4

## ठळक बातम्या

### एकनाथ खडसेंना कोर्टाचा झटका

**भोसरी (आरंभ पर्व) :** पुण्यातील भोसरी भूखंड गैरव्यवहार प्रकरणी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे यांच्या अडचणी वाढल्या आहेत. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा न्यायालयाने तत्कालीन महसूलमंत्री एकनाथ खडसे यांचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळला आहे. पुण्यातील भोसरी येथील एमआयडीसीच्या भूखंड गैरव्यवहार प्रकरणात एकनाथ खडसे, त्यांच्या पत्नी अन् जावयाचे नाव आले होते. या प्रकरणामुळे खडसे यांना मंत्रीपदही सोडावे लागले होते. या प्रकरणात खडसे यांनी मुंबईतील कोर्टात दोषमुक्त करण्यासाठी अर्ज केला होता. पण कोर्टाकडून हा अर्ज फेटाळण्यात आला आहे. त्यामुळे आता खडसे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

### बोगस लाभार्थ्यांवर कारवाई करणार

**पुणे (आरंभ पर्व) :** राज्यात सध्या विधानसभेचं हिवाळी अधिवेशन सुरु आहे. अधिवेशनात सध्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत चर्चा झाली. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांबाबत माहिती दिली आहे. लाडकी बहीण योजनेत सुरुवातीपासून किती लाभार्थी होते, याबाबत माहिती दिली आहे. आदिती तटकरे यांनी विधानसभेत लाडकी बहीण योजनेबाबत माहिती देताना सांगितले की, लाडकी बहीण योजनेचे सुरुवातीला रजिस्ट्रेशनवेळी २ कोटी ६३ लाख ८३ हजार ५८९ अर्ज आले होते. यापैकी २ कोटी ४३ लाख ८२ हजार ९३६ अर्ज स्विकारण्यात आले होते. यामधील २६ लाख अर्ज बाद झाले, असे तुम्ही बोलत आहात. ही संख्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने दिली होती. एखादा विभाग जेव्हा एखादी योजना राबवतो तेव्हा इतर विभागांचा डेटा हा त्यांच्याकडे नसतो.

# थेट विधानभवनात बिबट्या

### जुन्नरचे आमदार थेट बिबट्याच्या वेशात; बिबट्यांच्या जन्मदरावर नियंत्रण मिळवण्यासाठी अनोखा सल्ला



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शेत शिवारापासून ते शहरांपर्यंत धुमाकुळ घालणाऱ्या बिबट्याने आता नागपूरमध्ये सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशन सुरू असताना विधान भवनातच एण्ट्री केलीय. हा व्हिडीओ नीट पाहा. बिबट्याच्या वेशात दिसत असलेले हे आहेत शिंदेसेनेचे जुन्नरचे आमदार शरद सोनवणे. जुन्नर, खेड, आंबेगाव, शिरुरच नाही तर अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातही बिबट्याने अक्षरशः धुमाकूळ घातलाय.

त्याकडे लक्ष वेधण्यासाठी नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन सुरु असतानाच सत्ताधारी आमदार शरद सोनवणेंनी बिबट्याच्या वेशात एंट्री केली. एवढंच नाही तर शरद सोनवणे बिबट्याच्या वेशात थेट विधानसभेत पोहोचले. मात्र तालिका अध्यक्षांनी शरद सोनवणेंना चांगलंच सुनावलंय. वनमंत्र्यांनी बिबट्यांना १ कोटीच्या बकऱ्यांची मेजवानी देण्याचा सल्ला आमदार सोनवणेंनी केवळ धुडकावूनच लावला नाही तर बिबट्यांच्या जन्मदरावर नियंत्रण मिळवण्यासाठी अनोखा सल्ला दिलाय. एका बाजूला वनविभाग बिबट्याला जेरबंद करण्यासाठी सापळे लावत आहे. मात्र सतत लावलेल्या सापळ्यामुळे बिबट्याही आता हुशार झालाय. आता बिबट्याला पकडण्यासाठी जुन्नरमध्ये वनविभागाने कोंबडी ठेऊन सापळा लावला होता. मात्र बिबट्यानं पिंजऱ्यात न शिरताच बाहेरुन पंजा मारुन पिंजऱ्यातली कोंबडी ठार केल्याचा धक्कादायक प्रकार घडलाय. बिबट्यांच्या वाढत्या संख्येला पायबंद घालण्यासाठी बिबट्यांची नसबंदी, रेस्क्यू सेंटर्सचा उपाय महत्वाचा मानला जातो. मात्र सरकार बिबट्यांवर वैज्ञानिक तोडगे काढण्याऐवजी त्यांना मेजवानी देण्याचा घाट घालतंय. मुळात बिबट्यांना आळा घालण्यासाठी उपायांची तातडीनं अंमलबजावणी करणार की केवळ चर्चांचं गुऱ्हाळ रंगणार याकडे राज्याचं लक्ष लागलंय.

# लाडक्या बहिणी : ३०,००० महिलांचे अर्ज बाद



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लाडकी बहीण योजनेवरुन सध्या खूप चर्चा होताना दिसत आहे. दरम्यान, लाडकी बहीण योजनेत ईकेवायसीदेखील सुरु झाले आहेत. या योजनेतील लाभार्थ्यांचे क्रॉस व्हेरिफिकेशन सुरु आहे. या योजनेतून तब्बल ३०,००० महिलांना बाद करण्यात आले आहे. बुलढाण्यातली महिलांचे अर्ज बाद केले आहेत.

बुलढाणा जिल्ह्यात आज एकूण 6 लाख 40 हजार 879 महिला मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत होत्या. मात्र, या महिलांची तपासणी करण्यात आली. विविध कारणांमुळे 30 हजार 304 महिलांचा लाभ रद्द करण्यात आला आहे. तर 390 महिलांनी आपला लाभ बंद करण्यासाठी विनंती केली होती. त्यामुळे त्यांचाही लाभ बंद करण्यात आला आहे. सोबतच लाडकी बहीण योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी पात्र महिलांनी ईकेवायसी करण्याचे आवाहन महिला व बालकल्याण विभागाकडून करण्यात येत आहे.

लाडकी बहीण योजनेतील विविध जिल्ह्यातील महिलांचे अर्ज बाद करण्यात आले आहेत. महिलांच्या अर्जांची तपासणी केली जात आहे. यातील अनेक महिला या निकषांमध्ये बसत नाहीत. त्यामुळे त्यांचे लाभ बंद केले आहेत. आतापर्यंत लाखो महिलांचे अर्ज बाद करण्यात आले आहेत. याचसोबत महिलांची केवायसी प्रोसेस सुरु आहे. यातून फक्त पात्र लाभार्थ्यांनाच योजनेचा लाभ दिला जाईल.



# वाइन महाग होण्याची शक्यता

### 'न्यू इअर'च्या पार्टीत खिशाला कात्री लागणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वाइनच्या दरामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नवीन वर्षांच्या स्वागतासाठी करण्यात येणाऱ्या पार्टीमध्ये नागरिकांच्या खिशाला कात्री लागण्याची शक्यता आहे. राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे द्राक्ष उत्पादनाला मोठा फटका बसला. त्यामुळे वाइन उत्पादनात मोठी घट झाली आहे. याचाच परिणाम म्हणून वाइनच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. राज्यात अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे द्राक्ष बागांना मोठा फटका बसला. यामुळे द्राक्ष उत्पादनात जवळपास ६० टक्क्यांनी घट होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. परिणामी राज्यातील वाइन उत्पादनातही १ कोटी लिटरची घट होण्याची शक्यता आहे. उत्पादनातील या घटीमुळे वाइनचे दर वाढण्याची शक्यता आहे असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. वाइनसाठीच्या द्राक्ष शेतीचे क्षेत्र १० हजार हेक्टरवरून ६ हजार हेक्टरपर्यंत खाली आल्याची माहिती समोर आली आहे. राज्याला यावर्षी पावसाने झोडपून काढले. दिवाळीपर्यंत पाऊस पडला. यावर्षी राज्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील शेतीचे मोठे नुकसान झाले. द्राक्षांचे अधिक उत्पादन असलेल्या नाशिक, धाराशिव, सोलापूर, पुणे, सातारा आणि सांगली या जिल्ह्यांना देखील पावसाने झोडपून काढले होते. याठिकाणी सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला. अनेक जिल्ह्यात पूरस्थिती देखील होती. यामुळे द्राक्षबागा उद्ध्वस्त झाल्या. सतत पडणाऱ्या पावसामुळे द्राक्षांच्या उत्पादनात घट झाली जवळपास ६० टक्क्यांपर्यंत घट झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. याचाच परिणाम वाइन उत्पादनावर झाला असून त्यामध्ये एक कोटी लिटरने घट झाली असल्याचे सांगितले जात आहे. वाइन उद्योगाकडून दरवर्षी २० ते २५ रुपये किलो दराने द्राक्ष खरेदी केले जाते. पण यावर्षी पावसामुळे जास्त नुकसान झाल्यामुळे द्राक्ष प्रति किलो ४० ते ५० रुपयांना मिळणं देखील कठीण झाले होते. द्राक्ष उपलब्ध कमी झाले आणि जास्त किमतीत द्राक्ष खरेदी केले गेले.

## भटक्या कुत्र्यांना पकडा अन् प्राणीप्रेमींच्या घरी सोडा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मुंबई, पुण्यासह राज्यातील महत्त्वाच्या शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे. चिमुकल्यांसह महिला अन् वयोवृद्ध व्यक्तींवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या अनेक घटना काही दिवसात घडल्या आहेत. याच भटक्या कुत्र्यांवर अंकूश ठेवण्यासाठी प्रत्येक शहरात शेल्टर होमची सोय सरकार आणि प्राणी कल्याण संस्थांद्वारे केली जाते. पण तरीही संख्या काही कमी होताना दिसत नाही. याच मुद्द्यांवरून हिवाळी अधिवेशनात चर्चा झाली होती. या चर्चेवेळी बोलताना भाजप आमदाराने केलेल्या "भटक्या कुत्र्यांना पकडा अन् प्राणीप्रेमींच्या घरी सोडा" या वक्तव्याने नव्या वादाला तोंड फुटलेय. नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशनावेळी भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या वाढत्या संख्येवरून जोरदार चर्चा झाली.

# व्हीआयपींसाठी सामान्यांना त्रास का?

### स्वतंत्र कायदा नाही; पोलिसांचे अधिकार वापरून होते वाहतूक नियंत्रण

## शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतात VIP ताफा जाताना रस्त्यावरची वाहतूक थांबवणे ही नेहमीचीच बाब आहे. मात्र अनेक नागरिकांच्या मनात हा प्रश्न कायम उपस्थित राहतो. यासाठी नेमका कोणता कायदा आहे का?

याचे सरळ उत्तर म्हणजे नाही. VIP ताफ्यासाठी रस्ता बंद करण्याचा स्वतंत्र असा कोणताही कायदा भारतात अस्तित्वात नाही. तरीही, पोलिसांकडे असलेल्या काही विशिष्ट अधिकारांच्या आधारे ही प्रक्रिया राबवली जाते.

**कायद्याच्या कोणत्या तरतुदींवर आधारित असते ही कारवाई?**

**VIP सुरक्षा आणि वाहतूक नियंत्रणासाठी खालील कायदे पोलिसांना अधिकार देतात.**

- Indian Police Act आणि विविध राज्यांचे पोलीस कायदे - सार्वजनिक सुव्यवस्था व सुरक्षा राखण्यासाठी पोलिसांना तात्पुरती वाहतूक थांबवण्याचा अधिकार.
- Motor Vehicles Act, 1988 - मार्गावरील सुरक्षिततेसाठी किंवा तातडीच्या परिस्थितीत वाहन नियंत्रित करण्याची परवानगी.
- SPG Act व Z+ सुरक्षा प्रोटोकॉल - प्रधानमंत्री व काही अतिसंरक्षित व्यक्तींसाठी 'रूट सिक्युरिटी' म्हणून काही मिनिटांसाठी मार्ग मोकळा ठेवण्याची मुभा.

**न्यायालयांचा स्पष्ट संदेश: "VIP साठी जनता त्रस्त होऊ नये"**

- सुप्रीम कोर्टासह अनेक उच्च न्यायालयांनी या विषयावर नाराजी व्यक्त केली आहे.
- अनावश्यकपणे रस्ते बंद ठेवणे योग्य नसल्याचे न्यायालयांनी सरकारला बजावले आहे.
- सामान्य नागरिकांच्या हालचालींना अडथळा न आणता ताफा व्यवस्थापन करण्याचे निर्देश वेळोवेळी देण्यात आले आहेत.

**प्रत्यक्षात काय घडते?**


- प्रधानमंत्री किंवा सर्वोच्च सुरक्षा श्रेणीतील व्यक्ती वगळता इतर बहुतांश VIP साठी रस्ते पूर्णपणे बंद ठेवण्याची गरज नसते.
- पोलिसांना शक्य तितक्या कमी वेळात ताफा मार्गावरून सोडण्याचे निर्देश असतात.
- सार्वजनिक गैरसोयीचे प्रमाण वाढू नये यावर लक्ष ठेवले जाते.

**लोकांचे हक्क काय?**

जर वाहतूक नियंत्रणाच्या नावाखाली अनावश्यक विलंब झाल्याचे वाटत असेल किंवा रुग्णवाहिका सारख्या आपत्कालीन वाहनांना अडवले गेले असेल, तर नागरिकांना तक्रार करण्याचा अधिकार आहे.

- 112 वर कॉल
- स्थानिक DCP/ SP कार्यालय
- सोशल मीडियावर ट्रॅफिक पोलिसांना टॅग करून तक्रार

VIP ताफा व्यवस्थापन ही सुरक्षा कारणामुळे आवश्यक बाब असली, तरी सामान्य नागरिकांचा त्रास कमी करणे आणि पारदर्शकता राखणे ही शासन व पोलिसांची जबाबदारी आहे.

# मोठे प्लॅटफॉर्म्स गिग कामगारांना नवीन कामगार संहितेचे फायदे देतील

## त्यांना कमकुवत करणार नाहीत : एम्पॉवर इंडिया

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

जगभरात भारतातील गिग अर्थव्यवस्थेबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू असताना एम्पॉवर इंडियाच्या नवीन संशोधनामधून ठोस व पुरावा-आधारित चित्र दिसून येते. विशेष समूहाच्या नवीन विश्लेषणामधून निदर्शनास येते की, 70 टक्के गिग कामगारांची कुटुंबं आता उच्च वापरण्यायोग्य उत्पन्नाची मागणी करतात, ज्यामध्ये अंदाजित उत्पन्नाचे मॉडेल्स व सातत्यपूर्ण कामाच्या संधींना प्राधान्य देण्याची गरज आहे. हे विश्लेषण मोठ्या कंपन्या कामगार कल्याण सुधारण्याला महत्त्व देत नाहीत, या बाबीचे खंडन करते. अनिश्चित स्थितींना पाठिंबा देण्याऐवजी भारतातील सर्वात मोठ्या रिटेल व ई-कॉमर्स कंपन्या गिग कामगारांना औपचारिक करण्याला गती देत आहेत, तसेच त्यांचे संरक्षण करणाऱ्या कामगार संहितेला आकार देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ॲमेझॉन, डेलिव्हरी, रिलायन्स रिटेल यांसारखे प्लॅटफॉर्म्स पारदर्शक उत्पन्न, तंत्रज्ञान-सक्षम सुरक्षा यंत्रणा, सामाजिक सुरक्षा आराखड्यांसोबत एकीकरण आणि संरचित करिअर गतीशीलतेच्या माध्यमातून या परिवर्तनाला गती देत आहेत. एम्पॉवर इंडियाचे डायरेक्टर जनरल के. गिरी म्हणाले, भारतातील गिग अर्थव्यवस्था प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहेत, जेथे मोठ्या स्वदेशी व जागतिक कंपन्या कर्मचाऱ्यांप्रती गुंतवणूक करण्याला प्राधान्य देत आहेत, स्थिरता व संरक्षण एकत्र उपयुक्त ठरतील असे भविष्य घडवत आहेत. या प्रगतीमध्ये अडथळा आणणाऱ्या जागतिक संघटनांना भारताच्या वास्तविकतेबाबत, तसेच ते दावा करणाऱ्या कर्मचारी कल्याणाकडे भारत दुर्लक्ष करण्याबाबत गैरसमज झाला आहे. आमच्या संशोधनामधून निदर्शनास येते की ॲमेझॉन, डेलिव्हरी व रिलायन्स रिटेल यांसारख्या कंपन्या सुरक्षित कामाचे ठिकाण, पारदर्शक उत्पन्न संरचना आणि वास्तविक गतीशीलता डिझाइन करत आहेत. यामधून कामगारांना प्राधान्य देणारे जबाबदार धोरण निदर्शनास येते आणि भारतात ते मोठ्या प्रमाणात घडत आहे. सुरक्षितता, सर्वसमावेशकता, योग्य वेतन आणि सामाजिक संरक्षण वाढत आहे भारतात व्यापारी संस्था, धोरणकर्ते आणि मोठ्या कंपन्या यांच्यामध्ये उत्तम समन्वय असणे महत्त्वपूर्ण आहे. हा समन्वय असेल तरच भारतीय कामगार संहितेची अंमलबजावणी योग्यरित्या होण्यास सहकार्य मिळेल. भारतातील मॉडेल स्थिरता व संरक्षणाला एकत्र करणाऱ्या प्रमुख नियोक्त्यांच्या प्रत्यक्ष नाविन्यतांनुसार डिझाइन करण्यात आले आहे. या कंपन्यांनी आधीच लाखो एमएसएमईंना डिजिटली सक्षम केले आहे, लाखो अर्ध-वेळ व तात्पुरते रोजगार निर्माण केले आहेत आणि गिग कर्मचारीवर्गाला अपेक्षित उत्पन्न संधी दिल्या आहेत, जेथे गिग कामगारसंख्या 2030 पर्यंत 23.5 दशलक्षपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

सहयोगात्मक दृष्टिकोनामुळे नियमांचे पालन होण्यास मदत होऊ शकते, कामगारांना मोठ्या प्रमाणात फायदे मिळू शकतात आणि वास्तविकत: धोरणामध्ये चांगली सुधारणा होऊ शकते. भारतातील अनुभवामधून निदर्शनास येते की बाह्य घटकांनी स्थानिक गरजांप्रती चुकीचा आराखडा न लादता प्लॅटफॉर्म्स, नियामक व कामगारांनी सहयोगाने उपाययोजना केल्या पाहिजेत, तरच गिग कामगारांचे अधिक कल्याण होईल. गिग कामकाज पद्धतीमध्ये डेटा, पुरावा आणि भारतातील अद्वितीय वास्तविकतेबाबत चर्चा झाली पाहिजे, ज्यावर बाहेरील घटकांचा प्रभाव असू नये. व्यापारी संघटनांचे जागतिक मोहिम राबवण्याचे प्रयत्न गिग कामगारांच्या जीवनावर अनावश्यक विसंगती निर्माण करू शकतात, जे अयोग्य असण्यासोबत त्याचे प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. एम्पॉवर इंडिया आघाडीची धोरणात्मक विचारशील संस्था आहे, जी सर्वसमावेशक आर्थिक विकासाला गती देण्यासाठी माहिती व उपाययोजना निर्माण करण्याप्रती समर्पित आहे.

शिस्तबद्ध संशोधन व विश्लेषणाच्या माध्यमातून एम्पॉवर इंडिया शहरी व ग्रामीण समुदायांमध्ये स्थिर विकास आणि समान प्रगतीला चालना देण्यासाठी कृतीशील शिफारशी देते.



**एम्पॉवर इंडियाच्या संशोधनामधून परिसंस्थेमध्ये स्पष्ट सुधारणा होत असल्याचे दिसून येते**

- ई-श्रम आणि नियोक्ता-आधारित विमा अशा सामाजिक संरक्षण यंत्रणांसोबत प्रबळ सहयोग.
- सुरक्षितता उपाययोजनांमध्ये वाढ आणि स्थिर पर्यायांमुळे महिलांचा सहभाग वाढला आहे.
- कौशल्ये व गतीशीलता मार्गांची मोठ्या प्रमाणात उपलब्धता, उदाहरणार्थ, डेलिव्हरी प्रशिक्षण व संरचित उत्पन्न संधींमध्ये सतत गुंतवणूक करत आहे.
- ॲमेझॉनच्या प्रोजेक्ट आश्रय सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून सुरक्षितता व स्वास्थ्यामध्ये अधिक सुधारणा.

या सुधारणांमुळे भारतातील गिग कामकाज पद्धती असुरक्षित किंवा शोषणदायी असल्याच्या दाव्यांना आव्हान करण्यात आले आहे.

# दैनिक आरंभ पर्व : पुण्याचा धडाडीचा प्रहरी

## विशेष रिपोर्ट | पत्रकार : विशाल भालेराव, पुणे ग्रामीण

**(दै. आरंभ पर्व)**

जिल्ह्यातील भ्रष्टाचार, प्रशासनाची निष्क्रियता, जनतेच्या समस्या आणि सत्ताधाऱ्यांची उदासीन वृत्ती - हे मुद्दे बराच काळ दडपले गेले होते. पण या सर्वांवर थेट प्रहार करत, निर्भीडपणे सत्य समोर ठेवणारे माध्यम म्हणून आरंभ पर्व आज पुण्यात एक आगळे-वेगळे अस्तित्व निर्माण करत आहे. संपादक यांच्या नेतृत्वाखालील हे वृत्तपत्र आज पुण्यातील सर्वाधिक आक्रमक, धारदार आणि जनतेचा खरा आवाज म्हणून ओळखले जाते. सत्तेचा वा दबावगटांचा कोणताही धाक न बाळगता, प्रशासनातील गोंधळ, गैरव्यवहार आणि नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना सतत उजेडात आणण्याचे कार्य आरंभ पर्व करत आहे. गावोगाव पाण्याची टंचाई, रुग्णालयातील भ्रष्टाचार, पोलिसांची सुस्त तपासयंत्रणा, ठेकेदारांची निकृष्ट कामे, शेतकऱ्यांचे दाहक प्रश्न आणि बेरोजगार तरुणांची व्यथा - हे सर्व मुद्दे आरंभ पर्व दररोज ठळकपणे मांडत आहे.

अनेक प्रकरणांत या वृत्तपत्रातील बातम्या प्रकाशित होताच प्रशासनाची धांदल उडाल्याची उदाहरणे जिल्ह्यात दिसली आहेत.

संपादकांची "चुकीचा जो असेल त्याला वाचवणार नाही" ही कणखर भूमिका, हाच या वृत्तपत्राचा मूलभूत पाया मानला जातो. त्यामुळेच आरंभ पर्व काहींना त्रासदायक वाटते, पण जनतेला मात्र हाच ठाम दृष्टिकोन जवळचा वाटतो. म्हणूनच हे वृत्तपत्र कायम सर्वाधिक चर्चेत राहते.


आरंभ पर्व फक्त वृत्तपत्र नाही, तर एक सामाजिक चळवळ बनले आहे. विविध उपक्रमांचा यात समावेश आहे :

- भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात जनआंदोलन
- पर्यावरण संरक्षण आणि जनजागृती
- रुग्णालयांतील पीडितांना न्याय
- शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी धडक मोहीम
- बेरोजगार तरुणांसाठी मार्गदर्शन शिबिरे

डिजिटल माध्यमातही आरंभ पर्व तितक्याच जोरकसपणे काम करत असून, जलद अपडेट्स, पुराव्यासह बातम्या आणि थेट प्रहार करणारे हेडलाईन्स यामुळे हजारो वाचक या वृत्तपत्राशी जोडलेले आहेत.

**जनतेचा पहारेकरी, भ्रष्टाचाराविरोधाचे शस्त्र !**

**एकंदरीत, आरंभ पर्व हे केवळ वृत्तपत्र नसून पुणे जिल्ह्याचा धडाडीचा पहारेकरी, भ्रष्टाचाराविरुद्धचे प्रभावी शस्त्र आणि नागरिकांच्या न्यायलढ्याचा आवाज आहे.**




# भारताची डिजिटल फ्रेंडशिप्स क्रांती

**बेंगळुरू (दै. आरंभ पर्व)**

इंटरॅक्ट ग्रुपचा प्रमुख उत्पादन आणि भारताचा पहिला अवतार-आधारित ऑडिओ सोशल डिस्कव्हरी प्लॅटफॉर्म FRND यांनी आज 'इयर इन कन्व्हर्सेशन्स 2025' हा अभ्यास जाहीर केला, ज्यात भारताच्या डिजिटल वर्तनाचे चित्रण करण्यात आले आहे. आश्चर्यकारक असे की, एकूण सहभागातील तब्बल 92% सहभाग टियर-1 शहरांच्या बाहेरून येत आहे. हा अभ्यास एका स्पष्ट सांस्कृतिक बदलाकडे निर्देश करतो भारताच्या टियर-2 आणि टियर-3 शहरांमध्ये देशातील सर्वात अर्थपूर्ण आणि भावनिक डिजिटल फ्रेंडशिप्स घडत आहेत.

दक्षिणेतील एर्नाकुलम (केरळ) पासून उत्तरेतील अनंतनाग (जम्मू आणि काश्मीर) आणि पश्चिमेतील जामनगर (गुजरात) पर्यंत, वापरकर्त्यांनी व्हॉईस-आधारित साथसंगत, विकेंडला होणाऱ्या व्हिडिओ संभाषणांमध्ये आणि प्रादेशिक अभिव्यक्तींनी भरलेल्या संवादांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला, ज्यामुळे भारताच्या नव्या डिजिटल वर्तन पद्धती आकाराला आल्या. हैदराबाद, बेंगळुरू आणि चेन्नई यांनी सर्वाधिक सक्रिय वापरकर्त्यांसह भारताच्या 'कन्व्हर्सेशन मॅप'मध्ये आघाडी घेतली, तर आंध्र प्रदेशातील वापरकर्त्यांनी सर्वात जास्त काळ संवाद साधला.

# क्रॉम्पटनकडून प्रीमियम किचन अप्लायन्सेसचे नवे लॉंच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**



आधुनिक गरजा लक्षात घेऊन क्रॉम्पटन ग्रीव्ह्ज कन्झ्युमर इलेक्ट्रिकल्स लि.ने आपल्या प्रीमियम किचन पोर्टफोलिओचा विस्तार करत वियोना हॉब्स सिरीज आणि एलिटो बीएलडीसी चिमनी सिरीज लॉंच केली. 'स्मार्ट इनसाइड, स्टनिंग आउटसाइड' या थीमअंतर्गत सादर करण्यात आलेली ही उत्पादने भारतीय कुटुंबांच्या स्वयंपाकातील दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहेत. वियोना हॉब्स सिरीजमध्ये सीलबंद बर्नर सिस्टम, डायरेक्ट फ्लेम बर्नर्स, फ्लेम फेल्युअर डिव्हाइस आणि हायब्रिड हॉबटॉप डिझाइन यांसारखी वैशिष्ट्ये असून स्वच्छता, सुरक्षितता व जलद कुकिंगचा अनुभव देतात. एलिटो बीएलडीसी चिमनी सिरीजमध्ये १९०० $m^3$/तास शक्तिशाली सक्शन, इंटेलिजंट ऑटो-क्लीन तंत्रज्ञान आणि स्मार्ट ऑन फिचर असून धूर व तेलाच्या थरापासून स्वयंपाकघर स्वच्छ व आरामदायी ठेवते.

# एचआरएस अलुग्लेझ ५०.९२ कोटी रुपये उभारणार; आज उघडेल आयपीओ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सन २०१२ मध्ये स्थापित डिझाइन, निर्मिती आणि ॲल्युमिनियम उत्पादनांच्या उभारणीत गुंतलेली एचआरएस अलुग्लेझ लि. सार्वजनिक ऑफरमधून ५०.९२ कोटी रुपये उभारण्याची योजना आखत असून कंपनीचा आयपीओ ११ डिसेंबर रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि १५ डिसेंबर २०२५ रोजी बंद होईल. क्युम्युलेटिव्ह कॅपिटल प्रा. लि. ही ऑफरची प्रमुख व्यवस्थापक आहे. शेअर्स बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध केले जातील. ५०.९२ कोटी रुपयांची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर ही ५३.०४ लाख इक्विटी शेअर्सची नवीन इश्यू आहे, ज्यामध्ये २.७४८ लाख शेअर्सचा बाजार भाग समाविष्ट आहे. जनतेला ऑफर केलेल्या एकूण इश्यूमध्ये १० रुपयांच्या दर्शनी मूल्याचे ५०.२९ लाख इक्विटी शेअर्स आहेत ज्यांचे किंमत पट्टे ९४ ते ९६ रुपये प्रति शेअर आहे. इश्यूमधून मिळालेल्या एकूण निव्वळ उत्पन्नापैकी १८.३० कोटी रुपये अहमदाबादच्या राजोदा येथे असेंब्ली आणि ग्लास ग्लेझिंग लाइन स्थापन करण्याकरिता भांडवली खर्चासाठी, १९ कोटी रुपये खेळत्या भांडवलाच्या गरजांसाठी आणि उर्वरित सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरले जातील. किरकोळ श्रेणीमध्ये ऑफर केलेले एकूण शेअर्स १७.८५ लाख आहेत.

वैयक्तिक गुंतवणूकदारांसाठी किमान अर्ज २,४०० शेअर्स आहेत,जे प्रति शेअर ९६ रुपये (उच्च किंमत बँड) च्या ऑफर किमतीवर किमान २,३०,४०० रुपये गुंतवणुकीत अनुवादित होतात. लॉटचा आकार १,२०० शेअर्स आहे. सन २०१२ मध्ये स्थापन झालेली एचआरएस अलुग्लेझ लि. ही बांधकाम व्यावसायिक, कंत्राटदार, आर्किटेक्ट आणि संस्थांना मानक आणि सानुकूलित उपाय प्रदान करते.

तसेच साहित्य पुरवठा आणि खरेदी समर्थन प्रदान करते. उत्पादन सुविधा अहमदाबादमधील बावळा तालुक्यातील राजोदा येथे आहे, ज्याचे क्षेत्रफळ ११,१७६ चौरस मीटर आहे. हा प्लांट सीएनसी प्रिसिजन मशिनरी आणि पावडर कोटिंग सुविधांनी सुसज्ज आहे. सध्याच्या सुविधेला लागून असलेल्या १३,७१४ चौरस मीटरचा विस्तार प्रस्तावित आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत कंपनीकडे २८ सक्रिय प्रकल्प आहेत.

# अज्ञात गोष्टीचा शोध घेणारा माणूस स्वत: सर्वात मोठे रहस्य बनला

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**




ॲमेझॉन एमएक्स प्लेअर ही ॲमेझॉनची मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा आहे आणि तिने आज आपल्या भय - द गौरव तिवारी मिस्ट्री या आगामी शोधात्मक अलौकिक रोमांचक कथेचा ट्रेलर प्रदर्शित केला. भारतात सर्व प्रथम पॅरानॉर्मल गोष्टींचा शोध गौरव तिवारी यांनी घेतला होता आणि या मालिकेला त्यांचे जीवन आणि त्यांच्या कार्याशी संबंधित वास्तविक घटनांपासून प्रेरणा लाभलेली आहे. या मालिकेत करण टॅकर यांनी गौरव तिवारी यांची आणि कल्की कोचलिन आयरीन वेंकट यांची मुख्य भूमिका साकारलेली आहे. तसेच या मालिकेत दानिश सूद, सलोनी बत्रा, शुभम चौधरी, आणि निमिषा नायर यांसह एक उत्कृष्ट कलाकारांची टीम पहायला मिळते. या मालिकेचे दिग्दर्शन रॉबी ग्रेवाल यांनी केले असून ही मालिका नोंदविलेल्या प्रकरणांवर आणि वास्तविक घडलेल्या पॅरानॉर्मल शोधांद्वारे प्रेरित आहे आणि त्यावर आधारित आहे.

ट्रेलरची सुरुवात एका तणावपूर्ण जागेवरील शोध घेण्याने होते जी प्रेक्षकाला गौरव यांनी कधीतरी अनुभवलेल्या जगात थेट घेऊन जाते. अस्पष्ट हालचालींची लुकलुक, संकटात केलेले कॉल्स, बॅटऱ्या संपणे, अवतीभोवती आत्मा फिरणे, आणि विरोधाभासी कथा या गोष्टी त्यांनी पायलट म्हणून सुरु केलेला प्रवास आणि ते इंग्लंडमधील तत्वज्ञानविषयक चर्चकडे आकर्षित होऊन अखेरीस भारताचे पहिले पॅरानॉर्मल अधिकारी बनले असा जीवन बदलणारा अनुभव एकत्र दाखवितात. कथेत त्यांनी केलेले संघर्ष आधी पहायला मिळतात, नंतर सहकाऱ्यांना त्यांच्या बाबतीत आलेले संशय, कुटुंबाविषयी चिंता, आणि अज्ञात गोष्टींचा सामना करताना आलेला भावनिक बोजा इ. सादर केले आहे आणि हे सर्व वास्तविक प्रकरणांच्या फाइल्स आणि फील्ड नोट्सच्या माध्यमातून सांगितले गेले आहे. यासोबतच आयरीन वेंकट यांचा कथेचा प्रवास सुरू आहे, जिची भूमिका कल्की कोचलिनने साकारली आहे. ती एक लेखिका आणि पत्रकार आहे जिला सुरुवातीला खात्री नसते परंतु 32 व्या वर्षी गौरवच्या अचानक निधनानंतर ती त्यांच्या जगात ओढली जाते. ती त्यांच्या शेवटच्या कार्यांचा पुन्हा तपास करताना आणि गौरव तिवारी व त्यांच्या आयुष्यावर पुस्तक लिहून त्यांच्याकडून राहिलेले शोध पुन्हा पाहत असताना, मिथ्यांमागे असलेल्या माणसाबद्दलच्या खऱ्या सत्याची आणि आता त्याला परिभाषित करणाऱ्या वारशाची झलक ट्रेलर मधून दिसून येते.

या मालिकेबद्दल बोलताना, अमोघ दुसाड, संचालक आणि कंटेंट प्रमुख, ॲमेझॉन एमएक्स प्लेअर, म्हणाले, "ॲमेझॉन एमएक्स प्लेअर येथे आम्ही सतत आमच्या कंटेंट स्ट्रॅटेजीचा विकास करीत आहोत जेणेकरून डिजिटल कथाकथन स्वतः कसे वाढत आहे याचे प्रतिबिंब दाखविता येईल. भय – द गौरव तिवारी मिस्ट्री ही सखोल संशोधन केलेली मालिका आहे आणि वास्तविक अनुभवांनी त्यास प्रेरणा लाभली असून हॉरर-मिस्ट्री प्रकारात आमचा प्रवेश दर्शवित आहे. अलौकिक गोष्टी, भय आणि आत्मकथात्मक कथन यांच्या विलक्षण मिश्रणामुळे हे डिजिटल क्षेत्रात खरोखरच एक अनोखी देणगी बनत आहे. या मालिकेतून आमच्या कल्पक मर्यादा वाढविण्याच्या, परंपरांना आव्हान देण्याच्या आणि आश्चर्यचकित करणाऱ्या व अर्थपूर्ण कथा सादर करण्याच्या आमच्या श्रद्धेचे प्रदर्शन केले गेले आहे. आम्हाला आनंद आहे की आम्ही आमच्या प्रेक्षकांसमोर ही धाडसी, भावनिक स्तरांनी समृद्ध रोमांचक कथा सादर करीत आहोत." करण टॅकरने गौरव तिवारी यांची भूमिका साकारण्याबाबत म्हटले की, "आपण आपल्या समजाच्या पलीकडील शक्तींना तोंड देत आहोत, असे खरोखर मानणाऱ्या आणि धक्कादायक परिस्थितींमध्ये या जगाचा दु:खदरित्या निरोप घेणाऱ्या व्यक्तीची भूमिका मला यात साकारायची होती. त्यामुळे या भूमिकेच्या माध्यमातून आजपर्यंतचा सर्वात कठीण अनुभव लाभलेला आहे. त्यांची गोष्ट चित्रित करताना मी अनपेक्षित प्रकारांनी हादरून गेलो होतो ते एक असे व्यक्ती होते ज्यांनी समजून घेतले जाण्याची आणि ओळखले जाण्याची इच्छा बाळगली होती, आणि कोणत्यातरी छोट्याशा मार्गाने का होईना, मी त्यांचा प्रवास प्रकाशात आणण्यास मदत करू शकलो, याची मला कृतज्ञता वाटते. गौरवला समजून घेण्यासाठी, मला बहुतेक लोकं ज्यावर प्रश्न उपस्थित करतात अशा आव्हानांचा पाठपुरावा करण्यासाठी लागणारे धाडस ओळखावे लागले. त्यांच्या जीवनात भरपूर शंका, ताण आणि खरे धोके होते, तरीसुद्धा त्यांनी कधीही सत्याचा शोध घेणे थांबविले नाही. त्यांचे चित्रण करताना खूप उत्कटता जाणवली आणि एक कलाकार म्हणून माझ्यात बदल घडला. मला आनंद आहे की मला भारताच्या पहिल्या अधिसामान्य (पॅरानॉर्मल) शोध घेणाऱ्याची भूमिका पडद्यावर साकारण्याची संधी मिळाली आणि वास्तविक व विचित्ररीत्या अस्पष्ट, अशा दोन्ही जगात पदार्पण करण्याची संधी मिळाली.

## थोडक्यात पण महत्वाचे




### ॲल्पेनलिबेची नवीन मोहिम कडू आठवणींना बनवते गोड

मुंबई (आरंभ पर्व) : दि हाऊस ऑफ परफेत्ती व्हान मेल्ले या कंपनीच्या ॲल्पेनलिबेने तिची नवीन जाहिरात प्रकाशित केली जिचे शीर्षक आहे "ॲल्पेनलिबे उघडा, गोड बोला," ज्यात ब्रँडची रिच, कॅरामली चव कलहाचे क्षण कसे बदलते आणि लोकांना जवळ कसे आणते याबद्दल दाखवण्यात आले आहे. कथेच्या केंद्रस्थानी आपला ठसा, आनंद देणारी चव ठेवून, ॲल्पेनलीबे एका साध्या सत्यावर भर देते: रागात कोणी बोलल्यास ते रागाचे क्षण प्रेमात कसे बदलता येऊ शकतात, परंतु ॲल्पेनलिबेचा आनंद देणारा उच्च दर्जा हा वाद मिटवणे आणि क्षणांना गोड बनवणे याचा मार्ग आहे. ही नवीन TVC एका मुलाच्या वाढदिवस समारंभावर आधारित आहे, जिथे एक पाहुणा त्याच्या रागाने बोलण्यामुळे चुकीच्या पद्धतीने अडचणीत येतो. त्याच वेळी, एक ॲल्पेनलीबे कँडी मदतीला येते - आणि त्या तरूण वयातील पाहुण्याला तिची रिच, कॅरामली चव आवडते आणि त्याचे रागाचे बोलणे अचानक प्रेमात बदलते. ॲल्पेनलीबे योग्य वेळी कसा हस्तक्षेप करू शकते, कडू शब्द गोड कसे बनवू शकते आणि नाजूक झालेली परिस्थिती कशी चांगली बनवू शकते यावर ही फिल्म भर देते.

### बजाज लाइफतर्फे 'इंडिया कंझम्प्शन फंड' सादर

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील आघाडीच्या खाजगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज लाइफ इन्शुरन्सने बजाज लाइफ इंडिया कंझम्प्शन फंड हा नवीन फंड ऑफर (NFO) सादर करत असल्याची घोषणा केली आहे. हा फंड गुंतवणूकदारांना भारताच्या जलदगतीने वाढणाऱ्या उपभोक्ता अर्थव्यवस्थेत सहभागी होण्यास मदत करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. हा फंड घरगुती उत्पन्नातील वाढ, वाढती नागरीकरण प्रक्रिया, वेगाने वाढणारी डिजिटल स्वीकार प्रक्रिया आणि विविध क्षेत्रांतील भारतीय ग्राहकांच्या वाढत्या महत्त्वाकांक्षा यांमुळे लाभ होणाऱ्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणार आहे. हा फंड बजाज लाइफच्या युनिट-लिंक्ड इन्शुरन्स प्लान्स (ULIPs) अंतर्गत उपलब्ध असेल. बजाज लाइफ इंडिया कंझम्प्शन फंड आधारभूत म्हणून बजाज लाइफ ULIP उत्पादने पॉलिसीधारकांना जीवन संरक्षणासोबतच संपत्ती निर्मितीची संधी देत त्यांच्या जीवनातील उद्दिष्टे साध्य करण्यास सक्षम करतात.



### सिताऱ्यांनी सजलेल्या ग्रँड फिनालेसह पुणे ओपनची सांगता

पुणे (आरंभ पर्व) : आज सायंकाळी अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी येथे WPBLOnTour आणि पुणे युनायटेडने आयोजित केलेली शहरातील सर्वात मोठी पिकलबॉल स्पर्धा व महोत्सव 'पुणे ओपन 2025ची उत्साहात सांगता झाली. 4 डिसेंबर ते 7 डिसेंबर 2025 पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या या चार-दिवसीय इव्हेण्टने कॅम्पसला रोमहर्षक स्पर्धा, मनोरंजन आणि सामुदायिक सेलिब्रेशनच्या केंद्रामध्ये बदलले. या स्पर्धेमध्ये भारतभरातून 390 सहभागी आणि हजारो प्रेक्षक उपस्थित होते. ग्रँड फिनालेला बॉलिवुड सितारे व पुणे युनायटेडचे सह-मालक रितेश देशमुख आणि जिनिलिया डिसूझा, डॉ. सुधीर मेहता व श्रीमती सुनंदा मेहता (अध्यक्ष व संचालक, पिनाकल इंडस्ट्रीज व ईका मोबिलिटी), अजिंक्य डी. वाय. पाटील व पूजा पाटील (दूरदर्शी शिक्षणतज्ञ, अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी आणि रॅपर श्रेयस सागवेकर उपस्थित होते. रॅपर श्रेयस सागवेकर यांनी उत्साहवर्धक लाइव्ह परफॉर्मन्ससह संपूर्ण वातावरण प्रसन्न केले. वर्ल्ड पिकलबॉल लीगचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव नाटेकर म्हणाले, "पुणे ओपन 2025 ने प्रादेशिक पिकलबॉल स्पर्धांसाठी नवीन मापदंड स्थापित केला आहे. ऊर्जा, सहभाग आणि चाहत्यांच्या सहभाग अपेक्षेपेक्षा जास्त दिसून आला आहे. WPBLOnTour चा देशभरात अशाच प्रकारची गती निर्माण करण्याचा मनसुबा आहे.

### लाईव्ह इव्हेंट्स पाहणाऱ्यांची संख्या वाढली

पुणे (आरंभ पर्व) : 2025 हे वर्ष संपत असताना, भारतातील आघाडीचे मनोरंजन केंद्र असलेल्या बुकमायशो ने #बुकमायशोथ्रोबॅक2025 लॉंच केले आहे. हे अशा वर्षाचे सेलिब्रेशन आहे, जिथे मनोरंजन केवळ क्षणिक न राहता, एक चळवळ बनले. हे असे वर्ष होते, जिथे भारताने केवळ मनोरंजनाचा उपभोग घेतला नाही, तर त्याची निवड केली, स्वीकार केला आणि जाणीवपूर्वक ते जगले. विक्रम मोडणाऱ्या चित्रपटांपासून ते उत्साहवर्धक थेट कार्यक्रमांपर्यंत, 2025 ने हे सिद्ध केले की भारतीयांसाठी घराबाहेर पाऊल टाकणे हे सहज घेतलेला निर्णय नव्हता, तर ते आवश्यक होते. हा अहवाल वर्तणुकीतील निर्णायक बदलाची नोंद घेतो: मनोरंजनासाठी घराबाहेर पडणे हे, जेवण कोठे करायचे हे ठरवण्याइतकेच नित्यनेमाचे झाले आहे. चित्रपट, संगीत कार्यक्रम, कॉमेडी आणि संस्कृती यांना साप्ताहिक वेळापत्रकात कायमस्वरूपी स्थान मिळाले आहे. हा असा प्रेक्षक आहे जो हेतुपूर्वक अनुभवांचा शोध घेतो, पॉप संस्कृतीचा अचूक मागोवा घेतो आणि (कार्यक्रमांना) उपस्थित राहतो, कारण त्याला जागतिक स्तरावरील कथाकथन आणि थेट क्षण इथे, भारतात आणि समोरासमोर हवे आहेत.






दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५









# अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीने आयोजित केला पदवीदान समारंभ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीने अलीकडेच ७ वा पदवीदान समारंभ आयोजित केला, ज्यामध्ये बॅचलर ऑफ डिझाइन, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ डिझाइन, अनंत फेलोशिप इन सस्टेनेबिलिटी अँड बिल्ट एन्व्हायर्नमेंट, एमएससी इन सस्टेनेबिलिटी अँड बिल्ट एन्व्हायर्नमेंट आणि अनंत फेलोशिप इन क्लायमेट ॲक्शन या अभ्यासक्रमांतील एकूण २१९ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. या समारंभाचे मुख्य अतिथी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित आणि झोहो कॉर्पोरेशनचे चीफ



सायंटिस्ट व सह-संस्थापक डॉ. श्रीधर वेम्बू होते. अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष श्री अजय पीरामल, प्रॉवोस्ट डॉ. संजीव विद्यार्थी तसेच बोर्डाचे सदस्य समारंभात उपस्थित होते.

पदवीधर विद्यार्थ्यांना संबोधित करताना डॉ. श्रीधर वेम्बू म्हणाले, "अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीत येणे माझ्यासाठी अत्यंत आनंददायी ठरले. अनंतच्या विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि उद्देशपूर्ण डिझाइन्स पाहून मी प्रभावित झालो.

मी येथे असे उल्लेखनीय कार्य पाहिले, जे आपल्या देशाला आज अत्यंत आवश्यक आहे. आपण अनेकदा भूतकाळातील उपलब्धींचा गौरव करतो, पण वर्तमानात आपण काय निर्माण करतोय याकडे कमी लक्ष देतो. आपण आपल्या आयुष्याच्या मर्यादेपलीकडे विचार करून भविष्यासाठी निर्माण करायला हवे—आणि अनंत आपल्या विद्यार्थ्यांना नेमके हेच शिकवत आहे. चांगला डिझाइन मन आणि आत्मा दोन्ही उन्नत करतो, आणि ही भावना मी या कॅम्पसमध्ये सर्वत्र अनुभवली. स्वप्ने पाहत रहा, तरुण राहा, प्रासंगिक राहा. जेव्हा आपण अहं विसरून 'छाप पाडण्याचा' प्रयत्न करत नाही, तेव्हा आपणच सर्वाधिक प्रभाव पाडतो. समस्येवर लक्ष केंद्रित करा—असाधारण काम आपोआप घडते."

**कार्यक्रमादरम्यान अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष श्री अजय पीरामल म्हणाले, "डिझाइन आपल्याला उद्योगांचे पुनर्कल्पन, समुदायांचे पुनर्निर्माण आणि पर्यावरणाचे पुनरुज्जीवन करण्याची साधने देते. हे 'मेक इन इंडिया' या आकांक्षेतून 'डिझाइन फॉर इंडिया' या तत्त्वज्ञानाकडे जाण्याचा प्रवास आहे जो सर्जनशीलता, शिल्पकला आणि संवेदनशीलतेवर आधारित आहे. समारंभात विविध अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक उत्कृष्टता, उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी, सर्वोत्तम नवप्रवर्तन, सर्वोत्तम ग्रॅज्युएशन प्रोजेक्ट, सर्वोत्तम थीसिस, सर्वोत्तम लाइव्ह-एक्शन प्रोजेक्ट आणि सर्वोत्कृष्ट विद्यार्थी या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. पदवीदान समारंभासाठी विद्यापीठ कॅम्पसला एका सजीव प्रदर्शनीत रुपांतरित करण्यात आले होते, जिथे गॅलरी, ऑडिटोरियम आणि स्टुडिओंमध्ये विद्यार्थी प्रकल्प प्रदर्शित करण्यात आले—त्यांच्या नवप्रवर्तन आणि समर्पणाच्या प्रवासाचा उत्सव म्हणून.**

# ब्रेक्स इंडिया आणि टीबीके यांच्यात व्यवसाय सहयोग करार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ब्रेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि टीबीके कंपनी लिमिटेड यांनी अलीकडेच भांडवल आणि व्यवसाय सहयोग करारावर स्वाक्षरी केली. यासह, टीएसएफ ग्रुप कंपनी असलेल्या ब्रेक्स इंडियाने प्राथमिक भांडवल गुंतवणूकीद्वारे टीबीकेमध्ये १० टक्के हिस्सा मिळवला आहे. ही गुंतवणूक दोन्ही संस्थांसाठी एक महत्त्वाची प्रगती आहे. यामुळे व्यावसायिक वाहन ब्रेकिंगसाठी दोन्ही कंपन्यांच्या ताकदीचा फायदा घेण्याचा आणि ग्राहक आणि भागधारकांसाठी वाढीव मूल्य निर्माण करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

एम अँड एचसीव्ही विभागातील एक आघाडीची जागतिक ऑटो घटक उत्पादक टीबीके ब्रेक, पंप आणि इंजिन-संबंधित घटकांमध्ये विशेषज्ञ आहे. या घडामोडीमुळे दोन्ही संस्थांना एकमेकांच्या सामर्थ्याचा फायदा



घेण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे एकमेकांच्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये त्यांना प्रवेश मिळेल आणि नवीन ग्राहकांना गुंतवून ठेवण्याची आणि नवीन पुरवठा साखळ्यांचा शोध घेण्याची क्षमता लाभणार आहे. ब्रेक्स इंडियाच्या विद्यमान हायड्रॉलिक आणि न्यूमॅटिक उत्पादनांना नवीन निर्यात बाजारपेठांमध्ये सादर करण्याची संधी त्यातून लाभणार आहे .

त्याचप्रमाणे भारतीय देशांतर्गत बाजारपेठेत टीबीकेच्या पूरक उत्पादन पोर्टफोलिओचा विस्तार करण्याचा मार्ग सुध्दा प्रशस्त होणार आहे.. या भागीदारीद्वारे, दोन्ही कंपन्या एकमेकांच्या तांत्रिक ताकदी आणि ग्राहकांच्या आधारांना पूर्ण प्रमाणात पूरक ठरतील, संयुक्तपणे संबंधित बाजारपेठांसाठी उच्च मूल्यवर्धित उत्पादने आणि उपाय तयार करतील. एकत्रितपणे, आम्ही नवीन संधी उघडण्याचे आणि पुढील पिढीच्या गतिशीलतेच्या प्रगतीमध्ये योगदान देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे" असे टीबीकेचे अध्यक्ष आणि सीईओ श्री. काओरू ओगाटा म्हणाले.

"हा टप्पा टीबीकेसोबत दीर्घकालीन सहकार्यासाठी एक सुरुवात आहे. हे धोरणात्मक, दीर्घकालीन वाढीच्या आमच्या वचनबद्धतेला तो बळकटी देणार आहे . या करारामुळे, ब्रेक इंडियाला भारतीय बाजारपेठेसाठी टीबीकेच्या उत्पादनांच्या श्रेणीमध्ये प्रवेश मिळाला आहे आणि ब्रेक्स इंडियाचे अग्रगण्य न्यूमॅटिक ब्रेकिंग उत्पादने भारताबाहेरील नवीन ग्राहकांपर्यंत पोहोचतील. असे ब्रेक्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक श्रीराम विजी म्हणाले.

# सोनालिकाची नवीन कामगिरीसह यशस्वी आगेकूच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड सोनालिका ट्रॅक्टरने एप्रिल ते नोव्हेंबर २०२५ मध्ये १,२६,१६२ ट्रॅक्टरची आतापर्यंतची सर्वाधिक तारखेपर्यंतची वार्षिक (वायटीडी) विक्री करून एक नवीन विक्रमी कामगिरी नोंदविली आहे. सोनालिकाचे अथक नेतृत्व आणि भारत व जागतिक पातळीवर शेती यांत्रिकीकरणाला चालना देण्याचे प्रतिबिंब या असाधारण कामगिरीतून पडले आहे. भारतात पारंपारिक शेतीकडून तंत्रज्ञानावर आधारित शेतीकडे झपाट्याने होणाऱ्या बदलाचे संकेत या नवीन दमदार कामगिरीमधून मिळत आहेत. उत्तम कार्यक्षमता आणि वाढीव उत्पादकतेसाठी शेतकरी हेवी ड्यूटी ट्रॅक्टरवर अधिकाधिक अवलंबून राहत आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म, कामगिरी आधारित तंत्रज्ञान आणि शक्तिशाली



इंजिनांनी युक्त असलेले सोनालिकाचे हेवी ड्युटी ट्रॅक्टर जगभरातील १५० देशांमध्ये वेगवेगळ्या मातीच्या परिस्थितीत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी डिझाईन केलेले आहेत. आधुनिक ट्रॅक्टर आणि अवजारांचा जलद अवलंब, अनुकूल धोरणात्मक वातावरण आणि सातत्याने सुधारित एमएसपी रचनेमुळे नवीन विक्रीच्या उल्लेखनीय गतीला चालना मिळाली आहे. त्यामुळे नवीन शेतीची शैली स्वीकारण्याचा शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढतो.

# अलुकोबॉन्डने सादर केली 'अलुकोअर' ची नेक्स्ट-जेन श्रेणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्वित्झर्लंड-स्थित असलेल्या ३ ए कंपोझिट्स या जागतिक स्तरावर नव कल्पनाधारित व उच्च दर्जाचे अल्युमिनियम कंपोझिट्स मटेरियल निर्मिती करणाऱ्या आघाडीच्या कंपनीने आपल्या 'अलुकोबॉन्ड' या नाममुद्रे अंतर्गत आपल्या तीन दशकांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या पुढील पिढीतील 'अलुकोअर' या कॉम्पोझिट मटेरियल्सचा भारतातील आर्किटेक्ट्ससाठी व आर्किटेक्चरच्या क्षेत्रात परिवर्तन आणण्याच्या दृष्टीने विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. आपल्या नव-संशोधनाच्या समृद्ध वारशावर आधारित 'अलुकोअर' हे



उत्पादन अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अधिक प्रगत व सक्षम केले गेले असून आता ते 'अलुकोअर हनीकोम्ब पॅनेल्स' आणि 'अलुकोअर एसीसीपी या दोन श्रेणींत अभिनव स्वरूपात उपलब्ध आहे. 'अलुकोअर हनीकोम्ब' मध्ये दोन ॲल्युमिनियम शीट्सच्यामध्ये ॲल्युमिनियम हनीकोम्ब कोअर असतो, ज्यामुळे ते अत्यंत मजबूत आणि हलके बनते. तर 'अलुकोअर एसीसीपी.' मध्ये दोन ॲल्युमिनियम स्किन्सच्या मध्ये ॲल्युमिनियम कॉरुगेटेड कोअर असतो, जो त्याला अधिक कठोरता आणि लवचिकता प्रदान करतो. हे दोन्ही प्रकार भारतीय आर्किटेक्ट्सच्या बदलत्या गरजांनुसार विकसित करण्यात आले आहेत, ज्यामुळे ते उच्च व उत्कृष्ट डिझाईन, सौंदर्य आणि टिकाऊपणा यांचे परिपूर्ण संयोजन साधू शकतात.

हा विस्तार कंपनीच्या विद्यमान तंत्रज्ञानाधारित, नेक्स्ट -जेन क्लॅडिंग सोल्युशन्सच्या प्रमुख पोर्टफोलिओला अधिक बळकटी देईल, जिथे डिझाईन आणि कार्यक्षमतेची भूमिका महत्त्वाची असते. अलुकोअरचा वापर विशाखापट्टणम तसेच पटना विमानतळ, लखनौ येथील लुलु मॉल, नोएडा येथील मॅक्स टॉवर् इत्यादी भारतातील अनेक महत्त्वाच्या प्रतिष्ठीत पायाभूत व खाजगी प्रकल्पांमध्ये झाला आहे. अलुकोअरची उत्कृष्ट यांत्रिक वैशिष्ट्ये या उत्पादनाला फसाड क्लॅडिंग, रूफिंग आणि देखभालयोग्य अशा वॉकेबल रूफससाठी सुयोग्य बनवतात.






## थोडक्यात पण महत्वाचे

### आयडीएफसी फर्स्ट बँकेने फर्स्ट वॉव ब्लॅक लाँन्च

IDFC FIRST Bank

**मुंबई (आरंभ पर्व) : आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज फर्स्ट वॉव! ब्लॅक क्रेडिट कार्ड लाँन्चची घोषणा केली विद्यमान फर्स्ट वॉव! क्रेडिट कार्डची अपग्रेडेड आणि अधिक वैशिष्ट्यपूर्ण आवृत्ती, ज्याला फिक्स्ड डिपॉझिटद्वारे समर्थित केले आहे. हे एफडी बॅक्ड सिक्युअर्ड कार्डवर प्रीमियम फायद्यांसाठी, परवडणाऱ्या किमतीत डिझाइन केले आहे. कार्डचे प्रमुख आकर्षण म्हणजे आंतरराष्ट्रीय खर्चावर शून्य एफएक्स मार्कअप, मास्टरकार्ड आणि रुपे यूपीआयसह ड्युअल कार्ड आणि यूपीआय खर्चावर रिवॉर्ड्स. कार्डधारकांना एक भौतिक मास्टरकार्ड आणि यूपीआय-सक्षम रुपे व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड मिळते, जे एकाच खात्याशी एकीकृत क्रेडिट मर्यादा आणि एकच एकत्रित स्टेटमेंटसह अखंडपणे जोडलेले असते. ₹७५० + GST (जॉइनिंग आणि वार्षिक शुल्क) या किमतीत, हे कार्ड ₹५,००० पेक्षा जास्त किमतीचे स्वागत फायदे देते, ज्यामुळे ते सुरक्षित क्रेडिट-कार्ड क्षेत्रात एक मजबूत मूल्य प्रस्ताव बनते. कार्डधारकांना प्रवास सवलती, प्रीमियम डायनिंग ॲक्सेस आणि लाइफस्टाइल ऑफर्स तसेच ३० दिवसांच्या आत केलेल्या पहिल्या EMI व्यवहारावर अतिरिक्त ५% कॅशबॅक (₹१,००० पर्यंत) समाविष्ट असलेले स्वागत फायदे मिळतात.**



### ब्लॉपंक्ट कार इन्फोटेनमेंट आणि बीपीआयएन सोबत भागीदारी

**पुणे (आरंभ पर्व) : कार इन्फोटेनमेंट आणि ऑडिओ ॲक्सेसरीजमध्ये जागतिक स्तरावर विश्वासार्ह नाव असलेल्या ब्लॉपंक्ट न बीपीआयएन प्रायव्हेट लिमिटेडसोबतच्या भागीदारीचा २०४१ पर्यंत विस्तार करण्याची घोषणा केली आहे. हे नावीन्यपूर्णता, विश्वास आणि भारतीय ग्राहकांना जागतिक दर्जाचे ऑटोमोटिव्ह सोल्यूशन्स प्रदान करण्यासाठी सामायिक दृष्टिकोनावर आधारित २७ वर्षांच्या भागीदारीवर उभारणी करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकते. हा नूतनीकरण केलेला करार ब्लॉपंक्टची भारताच्या वेगाने बदलणाऱ्या ऑटोमोटिव्ह इकोसिस्टमसाठीची वचनबद्धता मजबूत करतो आणि एक प्रमुख वाढ भागीदार म्हणून बीपीआयएनची भूमिका अधोरेखित करतो. कार ऑडिओ आणि कार ॲक्सेसरीज दोन्ही समाविष्ट करणारी ही भागीदारी, ओईएम आणि आफ्टरमार्केट सहकार्य वाढवणे, उत्पादन उपलब्धता सुधारणे आणि उच्च-कार्यक्षमता इन्फोटेनमेंट सिस्टमची वाढती मागणी पूर्ण करणे हे उद्दिष्ट ठेवते. श्री पंकज जगवानी, बीपीआयएन प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक. लिमिटेडने म्हटले आहे की, "ब्लॉपंक्टसाठी भारत हा सर्वात रोमांचक आणि आशादायक बाजारपेठांपैकी एक आहे. हे पाऊल भारतीय ग्राहकांना जागतिक स्तरावर नावीन्य आणण्याच्या आमच्या सामायिक ध्येयाचे प्रतीक आहे.**






# भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन 'किसान' सुरु

## १० ते १४ डिसेंबर २०२५ पीआयईसीसी, मोशी येथे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन असलेल्या किसान या कृषी प्रदर्शनाचे पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व संमेलन केंद्र, मोशी येथे प्रदर्शन स्थळी पहिल्या भेट देणाऱ्या शेतकऱ्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. हे प्रदर्शन दिनांक १० ते १४ डिसेंबर २०२५ दरम्यान सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत सुरु राहणार आहे. हे किसान मालिकेतील ३३ वे कृषी प्रदर्शन असून या वर्षी प्रदर्शन ३० एकरावर विस्तारीत आहे.

किसान प्रदर्शनात ६०० हून अधिक कंपन्या, संशोधन संस्था व नवउद्योजक शेतीतील नवीन तंत्रज्ञान व उत्पादने सादर करतील. प्रदर्शनाच्या कालावधीत देशभरातून दोन लाखाहून अधिक शेतकरी भेट देतील असा अंदाज आहे. आधुनिक तंत्रज्ञान व नवे विचार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हे किसान प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

यंदा किसान प्रदर्शनात संरक्षित शेती, पाणी नियोजन, कृषी निविष्ठा, यंत्रसामुग्री, पशुधन, जैव, ऊर्जा, वाटिका व शेती लघु उद्योग अशी विभागवार दालने उभी करण्यात आलेली आहेत. प्रत्येक दालनात त्या विशिष्ठ उद्योगातील कंपन्यांचे स्टॉल शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. शेतीसाठी लागणारी यंत्रे व उपकरणांचे प्रदर्शन खुल्या जागेत आयोजित केले आहे.

किसान प्रदर्शनाला भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचा सहभाग लाभला आहे. तसेच कृषी विभाग महाराष्ट्र राज्य आणि इतर मान्यवर संस्थांचाही सहभाग आहे.

पूर्वनोंदणी : प्रदर्शनाची पूर्वनोंदणी मोबाईलद्वारे करण्याची सोय आहे. ३०,००० हुन अधिक शेतकऱ्यांनी पूर्वनोंदणी केली असून ही संख्या १००,००० ओलांडण्याची अपेक्षा आहे.किसान आता मोबाईलवरसुद्धा - प्रत्यक्ष प्रदर्शनातील सहभागासोबतच प्रदर्शक कंपन्या किसान डिजिटल प्लॅटफॉर्मवर देखील त्यांच्या उत्पादनांची यादी प्रसिद्ध करू शकतात. या माध्यमातून प्रदर्शकांची माहिती देशाच्या कानाकोपऱ्यातील १० लाख शेतकऱ्यांपर्यंत पाहोचवण्याचे योजले आहे. या शेतकऱ्यांना अधिक माहितीसाठी कंपन्यांशी संवाद साधणे शक्य होईल.

जागर : किसान जागर हा शेतीतील महत्त्वाच्या मुद्द्यांवर जनजागृती निर्माण करण्यासाठी सुरू



केलेला एक विशेष उपक्रम आहे. मातीमोल : मातीच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणारा उपक्रम योजला आहे. आपली माती जिवंत आहे का? याविषयी विचार करायला उद्युक्त करणे व मातीच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. हा उपक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान आणि इतर संबंधित विभागांच्या सहकार्याने संयुक्तपणे राबविण्यात येत आहे.

मनाची मशागत : IPH च्या सहकार्याने शेतकऱ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी एक विशेष उपक्रम आयोजित करत आहे. यात शेतकरी समुदायासमोरील ताणतणाव, भावनिक स्वास्थ्य आणि मानसिक आरोग्याशी संबंधित आव्हानांवर लक्ष केंद्रित केले जाईल.



## वडगाव-नऱ्हे-धायरीत पोकळे दाम्पत्याची एंट्री चर्चेत

### प्रभाग ३४ मधून बापू पोकळे व प्रिती पोकळे यांची भाजपकडून उमेदवारीची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
वडगाव-नऱ्हे-धायरी : आगामी पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३४ मध्ये राजकीय घडामोडींना वेग आला आहे. भारतीय जनता पक्षाने इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागवल्यानंतर प्रभागातील सर्वाधिक चर्चेत आलेली उमेदवारी म्हणजे खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब बाबासाहेब पोकळे पाटील आणि त्यांच्या पत्नी सौ. प्रितीताई बापूसाहेब पोकळे पाटील यांची.

पोकळे दाम्पत्याने प्रभाग ३४ साठी भाजपकडून अधिकृतपणे उमेदवारीची मागणी करत आपले अर्ज भाजपचे शहराध्यक्ष मा. धीरजजी घाटे यांच्याकडे सुपूर्द केले. अर्ज दाखल होताच कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पोकळे दाम्पत्याची उमेदवारी हा प्रभागातील राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

सामाजिक कार्य, सर्वसामान्यांशी असलेला जवळचा संवाद, प्रभागात गेल्या काही वर्षांपासून केलेल्या उपक्रमांमुळे पोकळे दाम्पत्याचा जनाधार मजबूत असल्याचे स्थानिक नागरिकांमध्ये मत व्यक्त होत आहे. विकासनिष्ठ दृष्टीकोन आणि प्रभागाच्या प्रश्नांवरील सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळे त्यांची लोकप्रियता वाढत गेली आहे.

अर्ज सुपूर्द केल्यानंतर बापूसाहेब पोकळे यांनी सांगितले, "प्रभाग ३४ चा सर्वांगीण विकास, नागरिकांची सेवा आणि सुरक्षित-सुंदर प्रभाग घडवणे हा आमचा संकल्प आहे. आपल्या विश्वासाच्या बळावर आम्ही उमेदवारीची मागणी केली आहे."

प्रितीताई पोकळे यांनीही महिलांच्या, युवकांच्या आणि ज्येष्ठांच्या प्रश्नांना प्राधान्य देत कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

भाजपकडून उमेदवारी मागितल्यानंतर प्रभाग ३४ मध्ये निवडणुकीची रंगत वाढली असून, पोकळे दाम्पत्याची दावेदारी ही या निवडणुकीतील महत्त्वाची घडामोड मानली जात आहे.

## प्रभाग ३३ : रुपेश घुले पाटील - रश्मी घुले पाटील दांम्पत्य कटिबद्ध!

### भाजपाकडे उमेदवारीची अधिकृत मागणी





**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
प्रभाग क्रमांक 33 (खडकवासला-शिवणे-धायरी भाग) येथून भाजपचे मंडलाध्यक्ष रुपेशतात्या घुले पाटील आणि त्यांच्या पत्नी रश्मी रुपेश घुले पाटील यांनी भारतीय जनता पक्षाकडे उमेदवारीची अधिकृत मागणी केली आहे. शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत दाम्पत्याने इच्छुक अर्ज दाखल केला. रुपेश घुले पाटील हे पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते असून अनेक वर्षांपासून प्रभागात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि रोजगारविषयक उपक्रम राबवत आहेत. मंडलाध्यक्ष म्हणून त्यांनी संघटना मजबूत करण्यासाठी सातत्याने काम केले असून त्यामुळे पक्षाकडून त्यांना उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. रश्मी घुले पाटील या देखील महिलांमध्ये सक्रिय असून प्रभागातील सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच पुढाकार असतो.

अर्ज भरताना घुले दांपत्याने सांगितले— "प्रभाग क्रमांक 33 हा आमचा परिवार आहे. या प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही दोघेही कटिबद्ध आहोत. नागरिकांच्या प्रत्येक गरजेसाठी आम्ही तत्पर राहू."

घुले दांपत्याच्या उमेदवारी मागणीनंतर प्रभागात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून त्यांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

## कोमल कुटे भाजपकडून इच्छुक



**धायरी (दै. आरंभ पर्व)**
प्रभाग क्रमांक 34 मधून भारतीय जनता पक्षाकडून कोमल सतीश कुटे यांनी उमेदवारीसाठी अर्ज दाखल केला आहे. त्यांनी आपला इच्छुक अर्ज शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या उपस्थितीत दिला. यावेळी त्यांच्या पती आणि नऱ्हेगावचे माजी उपसरपंच सतीश कुटे, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. कोमल कुटे या वीरांश युथ फाउंडेशनच्या अध्यक्षा असून त्या विविध सामाजिक उपक्रमांमधून नागरिकांमध्ये कार्यरत आहेत. महिलांसाठी, युवकांसाठी आणि सामान्य नागरिकांसाठी त्या अनेक उपक्रम राबवतात. त्यामुळे प्रभागात त्यांची चांगली ओळख तयार झाली आहे.

## प्रभाग ३४ मधून गंगाधर भडावळे यांची उमेदवारीची मागणी

### पक्षाने संधी दिल्यास सोने करणार असल्याचा भडावळे यांना विश्वास



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
प्रभाग क्रमांक ३४ मधील निवडणुकीची चर्चा जोर धरत असताना भाजप नेते माजी स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे यांनी इच्छुक उमेदवार म्हणून पक्षाकडे अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

भडावळे हे ज्येष्ठ, अनुभवी आणि सर्वसामान्य जनतेत लोकप्रिय नेते म्हणून ओळखले जातात. स्वीकृत नगरसेवक म्हणून त्यांनी प्रभागात अनेक उपयुक्त कामे केली असून, आमदार भीमराव तापकीर यांच्या माध्यमातून विविध विकासकामांना चालना दिली आहे. स्थानिक प्रश्नांवर त्यांची सततची बांधिलकी आणि जनतेशी असलेला जवळचा संपर्क यामुळे त्यांची उमेदवारी विशेष लक्षवेधी ठरत आहे.

अर्ज दाखल केल्यानंतर ते म्हणाले, "मी प्रभाग 34 साठी इच्छूक उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे. पक्षाने संधी दिल्यास त्या संधीचे निश्चितपणे सोने करेन. प्रभागाचा सर्वांगीण विकास आणि जनतेचा विश्वास जपणे हेच माझे ध्येय आहे."

त्यांच्या अर्जामुळे प्रभाग 34 मधील निवडणुकीची समीकरणे अधिक रंगतदार झाली असून, पक्षांतर्गत स्पर्धेलाही वेग आला आहे. दरम्यान, भडवळे यांचा अर्ज औपचारिकरीत्या दाखल करण्यात आला . त्यावेळी शहर उपाध्यक्ष सचिन मोरे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## उमेश सरपाटील यांचा इच्छुक अर्ज दाखल

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे महानगरपालिका निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत असलेल्या प्रभाग क्रमांक 33 खडकवासला-शिवणे-धायरी परिसरासाठी भाजप नेते,कोंडवे धावडे गावचे माजी सरपंच, यांनी भाजपाकडे अधिकृतपणे उमेदवारी मागितली आहे. भाजपाकडून इच्छुक कार्यकर्त्यांकडून उमेदवारी अर्ज मागविण्यात आले असून, त्यानुसार उमेशभाऊ सरपाटील यांनी आपला इच्छुक उमेदवारी अर्ज पक्षाकडे दाखल केला आहे. "पक्षाच्या प्रोटोकॉल प्रमाणे उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. पक्षाने संधी दिल्यास निश्चितपणे प्रभाग 33 च्या विकासासाठी इतरांपेक्षा जास्त योगदान देण्याचा निश्चितपणे प्रयत्न करेन "असा विश्वास यावेळी उमेश सरपाटील यांनी व्यक्त केला. अर्ज दाखल करताना भाजप पुणे शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप भारतीय जनता युवा मोर्चा शहराध्यक्ष दुष्यंत मोहोळ, खडकवासला विधानसभा युवा मोर्चा अध्यक्ष विशाल उभे, भाजप नेते अभिजित धावडे तसेच अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

## प्रभाग क्रमांक ३३ साठी हगवणे दांपत्याची उमेदवारी मागणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
प्रभाग क्रमांक 33 मधून माजी उपसरपंच किरण हगवणे व सौ .काजल हगवणे( कुंभारकर )या दांपत्याने भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारीची मागणी केली आहे. प्रभागातील सर्वच जागांसाठी त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून ग्रामपंचायत स्तरावर केलेल्या त्यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे त्यांना मोठा जनाधार लाभत आहे.

हागवणे कुटुंबाने गेल्या अनेक वर्षांत प्रभागातील विविध गावांमध्ये मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पायाभूत विकासाच्या कामांवर विशेष भर दिल्याने त्यांची मजबूत ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे आता पुणे महानगरपालिकेमध्ये जाऊन प्रभागाचा विकास करण्याचे ध्येय त्यांनी अवलंबले आहे.

अर्ज दाखल करताना किरण हगवणे यांनी सांगितले की, "पक्षाने आम्हाला संधी दिल्यास प्रभाग क्रमांक 33 चा सर्वांगीण विकास करून हा प्रभाग बदलून दाखवू.

लोकांचा विश्वास जपणे हेच आमचे ध्येय आहे." या वेळी शहर अध्यक्ष धीरज घाटे यांच्याकडे त्यांनी त्यांचा अर्ज इच्छुक उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी विविध मान्यवर व पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि त्यांनी दांपत्याला शुभेच्छा दिल्या.

## धनश्री कोल्हे यांचा इच्छुक अर्ज दाखल



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
प्रभाग क्रमांक 33 मधील ओबीसी महिला या राखीव झालेल्या जागेसाठी खडकवासला भाजपाच्या सरचिटणीस सौ. धनश्री दत्तात्रय कोल्हे या पक्षाकडून उमेदवारीसाठी इच्छुक असून त्यांनी पक्षाच्या नियमानुसार अधिकृत अर्ज दाखल केला आहे. शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी इच्छुक अर्ज सुपूर्द केला. या वेळी त्यांच्या पती व प्रदेश ओबीसी मोर्चाचे सचिव दत्तात्रय कोल्हे विशेष उपस्थित होते.

धनश्री कोल्हे या गेल्या काही काळापासून प्रभागातील विविध सामाजिक, महिला सक्षमीकरण, स्वच्छता, शिक्षण आणि कल्याणविषयक उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय आहेत. स्थानिक प्रश्नांवर थेट संवाद, समस्यांचे त्वरित निराकरण आणि सर्वसामान्यांशी असलेला दुवा म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांच्या इच्छुक अर्जाने प्रभागातील नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

## अभिजीत धावडे यांनी मागितली उमेदवारी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुणे महानगरपालिका निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत असलेल्या प्रभाग क्रमांक 33 खडकवासला-शिवणे-धायरी परिसरासाठी युवा व उत्साही नेते अभिजीत धावडे यांनी भाजपाकडे अधिकृतपणे उमेदवारी मागितली आहे. भाजपाकडून इच्छुक कार्यकर्त्यांकडून उमेदवारी अर्ज मागविण्यात आले असून, त्यानुसार अभिजीत धावडे यांनी आपला अर्ज पक्षाकडे दाखल केला आहे. "मी भारतीय जनता पार्टीचा तळागाळातील कार्यकर्ता आहे. आमदार भीमराव तापकीर साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आजवर प्रभागासाठी सातत्याने काम केले आहे. माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यास जर पक्षाने संधी दिली तर प्रभागाचा विकास करण्यासाठी प्रामाणिकपणे आणि जिद्दीने काम करून दाखवू," असा ठाम विश्वास अभिजीत धावडे यांनी यावेळी व्यक्त केला.

## प्रभाग क्रमांक ३५ : सविता गायकवाड यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुणे महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक 35 मध्ये राजकीय वातावरण जोरदार रंगतदार होत आहे. याच पार्श्वभूमीवर खडकवासला भाजपा महिला मोर्चा उपाध्यक्ष सौ. सविता रमेश गायकवाड यांनी आज औपचारिकपणे पक्षाकडे उमेदवारीचा अर्ज दाखल केला.

सविता ताईंच्या सामाजिक कार्याची प्रभागात चांगली ओळख आहे. महिलांसाठी सतत राबवलेले उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी वह्या-पुस्तकांचे वाटप, वृद्धाश्रमांना दिलेली मदत, स्वच्छता आणि आरोग्यविषयक जनजागृती यामुळे त्यांचे मजबूत जनसंपर्क तयार झाले आहेत.

विशेष म्हणजे, त्यांच्या सोबत कार्य करणारे त्यांचे पती रमेश गायकवाड, जे भाजप ओबीसी मोर्चाचे शहर उपाध्यक्ष आहेत, यांनीही प्रभागात दीर्घकाळ सक्रिय सामाजिक व राजकीय काम केले आहे. या दाम्पत्याने केलेल्या उपक्रमांची जनमानसात चांगली छाप पडली असून, दोघांच्या संयुक्त कार्यकर्तृत्वामुळे प्रभाग 35 मधून त्यांना संधी मिळेल असा विश्वास कार्यकर्ते व नागरिक व्यक्त करत आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करताना स्थानिक पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"प्रभागाचा सर्वांगीण विकास, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरक्षित वातावरण, तसेच नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवणे हेच माझे ध्येय आहे," असे सविता ताईंनी यावेळी सांगितले.

प्रभागातील वाढते समर्थन पाहता सविता रमेश गायकवाड यांची उमेदवारी आगामी निवडणुकीत लक्षवेधी ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.



## ॲड. प्रसन्न जगताप यांचा उमेदवारीचा इच्छुक अर्ज दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर "सर्वांच्या हक्काचा माणूस" म्हणून ओळखले जाणारे ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी भाजपा पुणे शहर कार्यालयात प्रभाग क्रमांक 35 सनसिटी माणिक बाग मधून आपला उमेदवारीचा इच्छुक अर्ज औपचारिकरित्या दाखल केला.

अर्ज दाखल करताना मोठ्या संख्येने कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि समर्थक उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि उत्साह वातावरण तापवणारा ठरला.

यावेळी बोलताना ॲड प्रसन्नदादा जगताप म्हणाले, "नागरिकांच्या गरजा पूर्ण करून प्रभाग अधिक स्मार्ट, सुरक्षित आणि सर्वसमावेशक बनवणे हे माझे उद्दिष्ट आहे. जबाबदारी मिळाल्यास समर्पणभावाने आणि विकासाच्या वचनबद्धतेने काम करणार आहे."

ॲड.प्रसन्नदादा जगताप यांच्या उमेदवारी अर्जामुळे प्रभागात निवडणूक रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत. कार्यकर्त्यांचा जोश आणि जनतेचा विश्वास लक्षात घेता "सर्वांचा हक्काचा माणूस" म्हणून त्यांच्याकडून मोठी अपेक्षा निर्माण झाली आहे.

प्रभाग क्रमांक 35 साठी प्रबळ दावेदार म्हणून ॲड.प्रसन्नदादा जगताप यांची चर्चा आहे.

## प्रभाग ३३ साठी भाजपकडून मनीषा मोरे इच्छुक

### मी निश्चित विजय मिळवेल म्हणत मोरेंनी दाखवला आत्मविश्वास



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
पुणे शहरातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या प्रभाग क्रमांक 33 (खडकवासला-शिवनेरी पार्ट) या प्रभागासाठी खडकवासला भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा मनीषाताई भगवान मोरे यांनी भाजपाकडून अधिकृतरित्या उमेदवारीची मागणी केली आहे.

शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या उपस्थितीत त्यांनी उमेदवारी इच्छुक अर्ज दाखल केला. न्यू कोपरे गावच्या माजी उपसरपंच म्हणून काम केलेल्या मनीषा मोरे यांची या परिसरात चांगली ओळख असून, महिलांसोबत सातत्याने सामाजिक उपक्रम राबविल्याने त्यांना प्रभागात चांगला जनाधार आहे.

यावेळी बोलताना मनीषाताईंनी म्हटले की, "कोणतेही आव्हान असले तरी त्याला सामोरे जाण्याची ताकद माझ्यात आहे. माझ्यावर प्रभागातील नागरिकांचा विश्वास आहे. पक्षाने मला संधी दिल्यास प्रभाग क्रमांक 33 मध्ये विजय मिळवण्याचा पूर्ण आत्मविश्वास आहे." प्रभाग क्रमांक 33 हा सर्वसाधारण महिला गट असल्याने त्यांनी या गटातून उमेदवारीची मागणी दाखल केली आहे.

अर्ज दाखल करताना त्यांच्या सोबत पती चेअरमन भगवानराव मोरे तसेच विविध पदाधिकारी उपस्थित होते. मनीषा मोरे यांच्या उमेदवारीमुळे प्रभाग 33 मधील राजकीय वातावरण आणखी रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## सारंग नवले यांचा इच्छुक उमेदवारी अर्ज दाखल!



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
प्रभाग क्रमांक 34 मधील राजकीय घडामोडींना वेग येत असताना भारतीय जनता युवा मोर्चाचे खडकवासला विधानसभाचे माजी अध्यक्ष सारंग बाळासाहेब नवले यांनी भाजपकडून इच्छुक उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. युवा नेतृत्व, संघटन कौशल्य आणि सामाजिक कार्यात त्यांचा सातत्यपूर्ण सहभाग यामुळे त्यांच्या अर्जाची प्रभागात मोठी चर्चा होत आहे.

पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांनी वेळोवेळी सक्रिय भूमिका निभावली असून स्थानिकांमध्ये विश्वासार्ह कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. अर्ज दाखल करताना सारंग नवले म्हणाले, "पक्षाने मला संधी दिल्यास निश्चितपणे त्या संधीचे सोने करेन."

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### टायगर आणि परेश रावल यांच्या उपस्थितीत कार्डियाक सेंटरचे उद्घाटन

मुंबई (आरंभ पर्व) : अ‍ॅडव्हान्स्ड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, विलेपार्ले (पश्चिम) येथे आज एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. हॉस्पिटलने आपले अत्याधुनिक टर्शियरी कार्डियाक केअर सेंटर (तृतीय श्रेणी हृदयविकार काळजी केंद्र) सुरू केले, ज्यामुळे पश्चिम उपनगरातील (जुहू, मुंबई) प्रमुख मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये (अनेक विशेष सेवा देणारे रुग्णालय) त्याचे स्थान आणखी मजबूत झाले आहे. या उद्घाटन समारंभाला बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ यांनी खास उपस्थिती लावली आणि त्यांनी औपचारिकरित्या या नवीन हृदयविकार सुविधेचे अनावरण केले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ अभिनेते परेश रावल यांच्यासह डॉ. जिगिशा देसाई (संचालक), डॉ. आशिष गोखले (सीईओ), श्री. अमान आणि इतर प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. नव्याने स्थापन झालेले कार्डियाक सेंटर अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे, ज्यात पुढील पिढीच्या निदान प्रणाली, संपूर्णपणे एकात्मिक कॅथेटेरायझेशन प्रयोगशाळा, आणि विशेष कार्डियाक क्रिटिकल केअर युनिट्स (हृदयविकारासाठी अतिदक्षता विभाग) यांचा समावेश आहे. हे सेंटर वरिष्ठ हृदयरोगतज्ज्ञ, कार्डिओथोरॅसिक सर्जन (हृदय व छातीच्या शस्त्रक्रिया करणारे सर्जन) आणि प्रशिक्षित कार्डियाक केअर व्यावसायिकांच्या बहु-अनुशासनात्मक टीमद्वारे चालवले जाईल, ज्यामुळे प्रतिबंधात्मक हृदयरोग काळजी आणि लवकर निदान करण्यापासून ते गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया आणि शस्त्रक्रियेनंतरच्या पुनर्वसन पर्यंतच्या संपूर्ण सेवा पुरवल्या जातील.

### मिळालेला पुरस्कार सक्षम टाटे यांना समर्पित : सिद्धांत चतुर्वेदी



मुंबई (आरंभ पर्व) : सिद्धांत चतुर्वेदीने आंतरजातीय हत्येतील पीडित सचिन (सक्षम) टाटे यांना पुरस्कार समर्पित केला, ही अर्थात वाखाणण्याजोगी बाब आहे. तो म्हणाला, हा सन्मान ज्या लोकांनी फक्त अस्तित्वासाठी लढा दिला, त्यांचा आहे. 'धडक २'साठी पॉवर पॅक्ड परफॉर्मर ऑफ द इयर हा पुरस्कार जिंकलेल्या अभिनेता सिद्धांत चतुर्वेदीने हा सन्मान महाराष्ट्रातील आंतरजातीय मानहानी हत्येतील पीडित सक्षम टाटे यांना अर्पण केला. नुकताच नांदेड जिल्ह्यात घडलेल्या या घटनेने देशभरात संतापाची लाट उसळली असून जातीय भेदभावावरील चर्चा पुन्हा पेटल्या आहेत. 'धडक 2'मध्ये सिद्धांतने नीलेश, एका दलित तरुणाची भूमिका साकारली आहे. जो व्यवस्थात्मक अत्याचारांशी झुंज देतो. ही भूमिका भावनिक प्रामाणिकतेसाठी, तसेच वंचित समाजांच्या भीती, स्वाभिमान आणि संघर्षाचे वास्तव चित्रण करण्यासाठी विशेष कौतुकास पात्र ठरली आहे. पुरस्कार स्वीकारताना सिद्धांत म्हणाला, "हा पुरस्कार फक्त माझा नाही. तो त्या प्रत्येकाचा आहे ज्यांना कधी ना कधी अस्पृश्य मानले गेले, दूर ढकलले गेले, भेदभाव सहन करावा लागला पण तरीही उभे राहण्याचे, लढण्याचे आणि केवळ अस्तित्वाचा अधिकार मागण्याचे धैर्य त्यांनी दाखवले. आणि शेवटी, हा सन्मान मी दिवंगत सक्षम टाटे आणि त्यांच्या कुटुंबीयांना आणि आंचलला समर्पित करतो. माझी सहानुभूती तुमच्यासोबत आहे".

### लक्ष्मीबाई वाडेकर यांचे निधन



पुणे (आरंभ पर्व) : शिव, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीतील नेते, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) महाराष्ट्र प्रदेश संघटन सचिव परशुराम वाडेकर यांच्या मातोश्री व आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या लक्ष्मीबाई बाळकृष्ण वाडेकर यांचे आज अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या ८७ वर्षांच्या होत्या. पुण्याच्या माजी उपमहापौर सुनिता परशुराम वाडेकर आणि हवेली तालुक्याच्या मंडलाधिकारी वर्षा आप्पासाहेब वाडेकर यांच्या त्या सासू होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना - नातवंडे असा परिवार आहे. लक्ष्मीबाई वाडेकर या मराठवाडा विद्यापीठ नामांतर आणि इंदू मिल यासह विविध सामाजिक आंदोलनात सक्रिय सहभागी होत्या.




### जागतिक डिजिटल डिटॉक्स दिन उत्साहात साजरा

पुणे (आरंभ पर्व) : डिजिटल उपकरणांच्या अतिवापराने तुटलेल्या मानवी संबंधांना पुन्हा जोडण्यासाठी आणि मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी 'झेप फाउंडेशन' आणि 'स्वान फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक डिजिटल डिटॉक्स दिन आज जगभर उत्साहात साजरा करण्यात आला. तब्बल ८० देशांमध्ये ही जागतिक डिजिटल वेलनेस चळवळ विविध उपक्रमांनी आयोजित करण्यात आली. या मिशनला महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश शासनाने अधिकृत पाठिंबा दिला असल्याने या चळवळीला राष्ट्रीय स्तरावर मोठे बळ मिळाले आहे. WDDD चा भाग म्हणून पुण्यात आज सकाळी शनिवार वाडा ते शनीपार चौक या मार्गावर भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये अनेक मान्यवर आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते: यामध्ये पोलीस उपायुक्त कृषीकेश रावळे, पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त माधव जगताप, 'झेप फाउंडेशन'च्या अध्यक्ष डॉ. रेखा चौधरी, 'स्वान फाउंडेशन' चे अध्यक्ष शशिकांत कांबळे, सचिव प्रसाद भोपळे, सिंहगड फाउंडेशनचे आबा गोळे यांच्यासह अनुराग चॅरिटेबल ट्रस्ट आणि हरीभाई देसाई कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# 'श्री सत्य साई रन अँड राईड' ने हजारोंना दिली प्रेरणा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सकाळच्या मंद वाऱ्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऐतिहासिक परिसराला स्पर्श करताच, पुणे शहरात उत्साह, ऊर्जा आणि भक्तीची प्रचंड लाट उमटली. भगवंत श्री सत्य साई बाबा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'श्री सत्य साई रन अँड राईड' या भव्य उपक्रमाचे आयोजन श्री सत्य साई सेवा संस्था, महाराष्ट्र (पश्चिम) यांनी केले होते. या उपक्रमाच्या उदात्त हेतूचा गौरव म्हणून युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने फिट इंडिया माध्यमातून देशभर या कार्यक्रमाला समर्थन दिले आहे. पुणे आवृत्तीमध्ये शहरातील नागरिक, युवक संघटना, स्वयंसेवक आणि अनेक मान्यवरांचा सहभाग झाला, ज्यातून एकात्मता आणि सामूहिक आरोग्याचा संदेश अधोरेखित झाला. 3 किलोमीटर, 5 किलोमीटर आणि 10 किलोमीटर धावणे व सायकलिंग या श्रेणींमध्ये 5,000 हून अधिक सहभागी उत्साहाने सहभागी झाले. विद्यापीठ परिसर सौहार्द, एकत्रता आणि सामाजिक जागरूकतेच्या रंगांनी उजळून निघाला. कार्यक्रमात सरकारी, औद्योगिक आणि नागरी क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये राजन नवानी, चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक, जेटलाइन ग्रुप ऑफ कंपनीज, धर्मेश वैद्य, स्टेट प्रेसिडेंट, श्री सत्य साई सेवा संस्था, महाराष्ट्र पश्चिम, कॅ. गिरीश लेले, जिल्हाध्यक्ष, श्री सत्य साई सेवा संस्था, पुणे, प्रा. पराग काळकर, माननीय प्र-उपकुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, श्री. रवींद्र शिंगापुरकर, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, प्रा. डी. बी. पवार, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, प्रा. ज्योती भाकरे, कार्यवाहक निबंधक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, सुचेता कडेठाणकर, पुण्यातील भारतीय क्रीडापटू, रिची माथुर, सह-संस्थापक आणि उपाध्यक्ष, लाइटहाऊस कम्युनिटीज, अभिषेक उभे, अनुभवी क्रीडापटू, डॉ. सुधाम शेखे, सहाय्यक संचालक, क्रीडा, डॉ. विष्णु पेटखर, प्रमुख, क्रीडा आणि शारीरिक शिक्षण विभाग, प्रा. विनायक जोशी, संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष, प्रा. वैभव जाधव, दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्र मान्यवरांचा समावेश होता: श्री धर्मेश वैद्य, स्टेट प्रेसिडेंट, श्री सत्य साई सेवा संस्था, महाराष्ट्र पश्चिम, म्हणाले,"श्री सत्य साई रन अँड राईड हा फक्त एक उपक्रम नाही; तो कृतीतून हृदयांना जोडणारा एक उपक्रम आहे. आम्ही भगवंत श्री सत्य साई बाबा यांच्या 100 व्या जन्मवर्षाचे औचित्य साधत त्यांच्या निःस्वार्थ प्रेम, एकात्मता आणि सेवा या संदेशाला पुढे नेत आहोत. आज पुणे ने फक्त धाव किंवा सायकल चालवली नाही तर या चिरंतन मूल्यांची पुन्हा प्रचिती दिली." प्रा.पराग काळकर, माननीय प्र-उपकुलगुरू, एसपीपीयू यांनी सांगितले,"अशा कार्यक्रमांची सांगड फिट इंडिया च्या दृष्टीकोनाशी आणि युवकांच्या सक्षमीकरणाशी अत्यंत सुंदरपणे जुळते. श्री सत्य साई सेवा संघटना नागरिकांना एका ध्येयासाठी एकत्र आणत आहे — करुणेसह फिटनेस, भक्तीसह शिस्त आणि सेवेसह सामर्थ्य."

## अनाथ मुलांनी केली पुण्याची सफर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

माऊली अनाथ आश्रम निराधार सेवा संस्था ट्रस्ट,नसरापूर येथील ६० हून आधिक अनाथ मुलांनी आज पुण्याची सफर करत ऐतिहासिक पुणे शहराचा वारसा समजून घेतला.निमित्त होते सोपान मोरे फाउंडेशनच्या वतीने आयोजित एक दिवाशिय पुणे दर्शन सहलीचे.

नसरापुर येथून आलेल्या या अनाथ विद्यार्थ्यांनी पुण्याचे ग्रामदैवत कसबा गणपतीच्या दर्शनाने आपल्या सहलीची सुरुवात केली. त्यांनंतर लाल महाल मध्ये जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समजून घेतला,शनिवार वाड्याला भेट देऊन शहराचा ऐतिहासिक वारसा समजावून घेतला. यासोबतच शिवाजीनगर येथील एव्हीएशन गॅलरी मध्ये जाऊन विमानांचा इतिहास आणि तंत्रज्ञान लघुपटच्या व लघुरूपांच्या माध्यमातून समजून घेतले. याशिवाय या मुलांनी पुणे मेट्रोच्या प्रवासाचाही आनंद लुटला. तसेच पू. ल. देशपांडे उद्यान (ओकोयाम गार्डन) येथे या सहलीचा समारोप झाला.

## प्रभाग क्रमांक ३३ मध्ये रुपेश तात्यांचा अनोखा पॅटर्न

- भव्य नोकरी महोत्सवातून शेकडो युवक–युवतींना रोजगार
- भाजपा मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील आयोजित नोकरी महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद!!




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 33 मध्ये नांदेड गावचे माजी उपसरपंच व भाजप मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी बेरोजगार युवक–युवतींसाठी भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन केले. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकारणाला मागे सारत रोजगाराला प्राधान्य देत राबवलेल्या या उपक्रमाचे प्रभागभर मोठे कौतुक होत आहे.

निर्मला घुले प्रतिष्ठान आणि विविध सहयोगी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. नामांकित 29 कंपन्यांनी सहभाग नोंदवला असून, या महोत्सवात सुमारे 600 युवक–युवतींनी उपस्थिती नोंदवली, तर तब्बल 150 उमेदवारांची तात्काळ निवड करण्यात आली.

युवक–युवतींमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून "निवडणुकीच्या राजकारणापेक्षा रोजगार देणारी शैलीच खऱ्या विकासाचा मार्ग" असल्याचा सूर नागरिकांतून उमटताना दिसला.

रुपेशतात्यांनीही "माझा प्रभाग, माझी जबाबदारी" या संकल्पनेतून पुढील काळातही असे रोजगारमूलक उपक्रम सातत्याने राबवण्याचा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमामुळे प्रभाग क्रमांक 33 मध्ये रोजगाराचा उजेड पसरत असून शेकडो युवक–युवतींच्या भविष्यास नवी दिशा मिळाली आहे.

कार्यक्रमाला शंकर इंगवले, हेमेंद्र जोशी, गिरीश वसेकर, महेश बजाज, राजेश नागपूरे, उमा राय, महिला आघाडी अध्यक्षा मनिषाताई मोरे, किरण हगवणे, स्वप्नील साळवी, अनिल पोकळे, सुजित कारले तसेच कंपन्यांचे अधिकारी अभिषेक, सुनील, काकासाहेब भुरे, गंगाधर कुलकर्णी व इतर HR अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी जितेंद्र धुमाळ, वेदांत घुले-पाटील, साहिल घुले-पाटील, महेश कांबळे, जितेंद्र किल्लेदार यांनी विशेष परिश्रम घेतले.

## "जीडीसी टेक मेगा इव्हेंट २०२५" यशस्वीरित्या संपन्न




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरात ३ दिवस चाललेला "जीडीसी टेक मेगा इव्हेंट २०२५" यशस्वीरित्या संपन्न झाला. देश-विदेशातून आलेल्या ५,००० हून अधिक अभ्यागतांची उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली. या भव्य आयोजनातून भारतीय अ‍ॅल्युमिनियम डाय कास्टिंग उद्योग जागतिक पातळीवरील आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज असल्याचे स्पष्ट झाले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने झाले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी लाइट वेट अलॉय, नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि शाश्वत उत्पादन प्रक्रिया यांचे महत्व अधोरेखित केले. जागतिक पुरवठा साखळीतील बदल आणि भविष्यकालीन मोबिलिटीच्या गरजा लक्षात घेता भारतासाठी अ‍ॅल्युमिनियम व मॅग्नेशियम कास्टिंग क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

या मेगा इव्हेंटमध्ये डाय कास्टिंग मशिनरी उत्पादक, उपकरणे, तांत्रिक सोल्युशन्स पुरवठादारांचे २०० हून अधिक प्रदर्शन स्टॉल्स होते. यासोबतच तांत्रिक परिषद, बायर–सेलर मीट, सीईओ मीट, तरुणांसाठी क्विझ स्पर्धा, महिला सक्षमीकरण कार्यक्रम, तसेच मॅग्नेशियम कास्टिंगवरील स्वतंत्र तांत्रिक परिषद आयोजित करण्यात आली होती.

या व्यासपीठामुळे व्यवसायिक संपर्क, तांत्रिक ज्ञानाची देवाणघेवाण, नवीन भागीदारी, व्यवसाय संधी आणि रोजगार निर्मिती यांना मोठा चालना मिळाली.

हा भव्य कार्यक्रम जीडीसीटेक चे संस्थापक आर. टी. कुलकर्णी आणि अध्यक्ष अनिल कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला. यासाठी उपाध्यक्ष जितेंद्र लखोटिया व राजेंद्र अपशंकर, सचिव अनिरुद्ध इनामदार आणि खजिनदार नितीन भागवत यांनी विशेष योगदान दिले.

जीडीसी टेक मेगा इव्हेंट २०२५ च्या यशस्वी आयोजनामुळे भारतीय डाय कास्टिंग उद्योगासाठी जीडीसी टेक फोरमचे महत्व अधिक दृढ झाले आहे. उद्योगविकास, कौशल्यवृद्धी, निर्यात वाढ, रोजगार निर्मिती आणि भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी देणे या दिशेने जीडीसी टेक फोरम सातत्याने कार्य करत असून भारताला जागतिक उत्पादन केंद्र म्हणून पुढे नेण्याचा त्यांचा संकल्प अधिक दृढ पणे दिसून आला अशी माहिती फोरम चे खजिनदार नितीन भागवत यांनी दिली.



## चासकमान पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

वाफगाव (ता.खेड) परिसरातील शेतकरी व पाणी वाटप संस्थेचे संचालक यांनी येथील चासकमान पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर बुधवारी (दि. १०) धरणे आंदोलन केले.

यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते. आंदोलकांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. पुणे विभागाचे अधीक्षक अभियंता यांनी वाफगाव लघु पाटबंधारे विभागाच्या तलावातील अनधिकृत मोटारी बंद करण्याचे आदेश दिले असतानाही कार्यकारी अभियंता, उपअभियंता व चासकमान पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता यांच्या कडून कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने नाईलाजाने हे धरणे आंदोलन केले असल्याचे वाफगावचे माजी उपसरपंच अजय भागवत यांनी सांगितले.'

# प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध असणारे हरिभाऊ

## संयम, संघर्ष आणि सेवा या तिन्हींचा संगम असलेले नेतृत्व

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**



**(दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक हरिदासभाऊ चरवड यांचा वाढदिवस साजरा होत असताना दैनिक आरंभपर्व तर्फे त्यांच्याशी विशेष संवाद साधण्यात आला. प्रभाग क्रमांक 34 मध्ये एक कार्यकर्त्यापासून लोकप्रिय जननायक बनण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाचा मार्ग आखणारे, आणि आपल्या प्रभागातील समस्या स्वतःच्या घरच्याप्रमाणे सोडवणारे हे नेतृत्व आज नागरिकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण करून आहे.

**संघर्षातून समाजसेवेपर्यंतचा प्रवास :** साध्या घरातील मुलाने अभियांत्रिकी करण्याचे स्वप्न पालकांनी पाहिले होते; पण हरिदासभाऊंच्या मनात पेटलेली समाजसेवेची ज्वाला अधिक प्रबळ होती. गरिब, वंचित आणि सामान्य नागरिकांच्या अडचणी जवळून जाणून घेताना त्यांना जाणवले की केवळ नोकरी किंवा व्यवसाय नव्हे तर सामाजिक कार्यच खरा बदल घडवू शकतो.

यातूनच 'केदारनाथ सामाजिक संस्थे'ची स्थापना झाली. या संस्थेमार्फत त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले-शैक्षणिक मदत, आरोग्य शिबिरे, महिलांसाठी सुरक्षा उपक्रम, युवकांसाठी प्रोत्साहन कार्यक्रम-यामुळे लोकांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास आणि जिव्हाळा निर्माण झाला.

राजकारणात प्रवेश-पदासाठी नव्हे तर जनतेसाठी

राजकारणात प्रवेश केला तो केवळ एक ध्येय ठेवून- "ज्याला आवाज नाही, त्याचा आवाज बनायचं."

प्रभागातील अडचणी त्यांनी समोरून अनुभवल्या आणि त्या समस्यांवर लढा देताना ते लोकांच्या मनात घर करून गेले. संयम, जिद्द आणि सातत्य ही त्यांची तीन बलस्थाने.

हरिदासभाऊ सांगतात- "अपयशानंतर यश असतं. पैसा नंतर येतो; आधी माणसांचा विश्वास जिंकावा लागतो."

**2017 चा विक्रमी विजय - आणि कामांची सलग मालिका**

2017 च्या सार्वत्रिक निवडणुकीत सर्वाधिक लीड घेऊन ते विजयी झाले. हे फक्त राजकीय यश नव्हते, तर जनतेचा त्यांच्यावरचा ठाम विश्वास होता. विजय मिळाल्यानंतर त्यांनी जनसेवेचा वारसा थांबू दिला नाही.




**त्यांनी राबवलेली प्रमुख कामे-**

- प्रभागातील रस्ते, गटारे, पाणीपुरवठा यांसारख्या पायाभूत सुविधांचे उन्नतीकरण
- क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना
- महिलांसाठी सुरक्षित आणि समर्थक वातावरणाची निर्मिती
- वृद्ध, विद्यार्थी आणि गरजूंसाठी सामाजिक मदत कार्यक्रम
- युवकांसाठी मार्गदर्शन आणि रोजगाराभिमुख उपक्रम

या कामांमुळे हरिदासभाऊंची प्रतिमा कार्यक्षम आणि लोकाभिमुख नेतृत्व म्हणून अधिक बळकट झाली आहे.

ते पुन्हा नगरसेवक पदासाठी नव्हे तर प्रभागाच्या पुढील उन्नतीसाठी नागरिक त्यांच्याकडे पाहत आहेत. त्यांच्या अष्टपैलू स्वभावामुळे व सर्वांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यामुळे आगामी महानगरपालिका निवडणुकीत त्यांची दावेदारी अधिक मजबूत मानली जात आहे.

हरिदासभाऊ म्हणाले- "जनतेची साथ हीच माझी सर्वात मोठी संपत्ती आहे. मी केलेल्या कामांची खरी पोचपावती म्हणजे नागरिकांचे प्रेम आणि आशीर्वाद. पुढेही मी प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध राहून दिवस-रात्र काम करणार आहे. आपण दाखवलेल्या विश्वासासाठी मनःपूर्वक आभार आणि भविष्यातही अशीच साथ मिळावी ही विनंती."

**दैनिक आरंभपर्व तर्फे माजी नगरसेवक हरिदासभाऊ चरवड यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!**

## थोडक्यात पण महत्वाचे




### भारताच्या आदिवासी कला व कलाविश्व जिवंत ठेवणारे व्यासपीठ

पुणे-महेश वरवटे (आरंभ पर्व) : ज्येष्ठ चित्रकार कै.प्रा. रावसाहेब गुरव यांच्या स्मरणार्थ, सुंबरान आर्ट फाऊंडेशनच्या सहकार्याने भारतातील कला आणि कलाकारांच्या कलात्मिक प्रवासाला स्पर्श करणारा सुंबा आर्टफेस्ट २०२५, सुरु होत आहे. शिक्षक, मार्गदर्शक आणि निर्माता म्हणून आयुष्याचा प्रत्येक श्वास कलेला दिलेला कला त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू होती. कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ या लहानशा गावात जन्म घेऊन, बालपणातील दृश्यं, लोककथा आणि निसर्गाचा अनुभव त्यांनी आपल्या चित्रांमध्ये जपला, मेंढपाळ, त्यांच्या उपजीविका आणि जीवनशैली यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी रेखाटलेली 'धनगर श्रृंखला' त्यांच्या कार्यातील सर्वात लोकप्रिय ठरली. साठहून अधिक वर्ष त्यांनी अध्यापन, चित्रकला आणि तरुण कलाकारांना मार्गदर्शन यांत वेचली. अनेक कलाकारांना त्यांच्यामुळे स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळाली. हा उत्सव त्या आत्मीयतेचा सन्मान आहे तो दरवर्षी त्याच मूल्यांची आठवण करत राहील.

### भाजपकडे १६५ जागांसाठी तब्बल पाच हजाराहून अधिक उमेदवार

मुंबई (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टी कडून इच्छुकांचे अर्ज मागविण्यात आले होते त्यामध्ये विविध तब्बल पाच हजारहून अधिक उमेदवारांनी अर्ज दाखल केले असल्याचे समजत आहे. अनेक इच्छुक उमेदवार यांनी पक्षाकडे आपापल्या प्रभागातून उमेदवारी मागितली आहे. त्यामुळे आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप फेवरेट असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.



### अखिल औदुंबर नगर प्रतिष्ठानतर्फे दिमाखात दत्तजयंती उत्सव संपन्न

हडपसर(आरंभ पर्व) : हडपसर-काळेपडळ परिसरात अखिल औदुंबर नगर प्रतिष्ठानतर्फे मार्गशीर्ष पौर्णिमेनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही दत्तजयंती उत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात आला. "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" या जयघोषाने गुरुवारी सायंकाळी संपूर्ण परिसर दुमदुमला होता. दत्त जन्मसोहळ्याचे औचित्य साधून भक्तांची मोठी गर्दी उत्साहात सहभागी झाली. गेल्या २५ वर्षांपासून प्रतिष्ठानतर्फे अखंडपणे दत्तजयंती सोहळा साजरा करण्याची परंपरा कायम असून, यावर्षी दत्त मंदिर परिसरात आकर्षक फुलसजावट करण्यात आली होती. भाविकांसाठी महाप्रसादाचे उत्तम नियोजन करण्यात आले होते. सुमारे ३ हजार भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदिप कोतवाल, कार्याध्यक्ष शिवराज कटके, गोरख जठार, स्वप्नील पिसे, प्रशांत भोसले, विलास कोतवाल, सुमित पवार, सचिन कळसाईत, महादेव डोळे, राहुल दिवटे, हिरामण तावरे, शिवकुमार नायकवडे आणि कार्यकर्त्यांच्या टीमने मनःपूर्वक परिश्रम घेतले. अखिल औदुंबर नगर प्रतिष्ठान सामाजिक बांधिलकी जपत वर्षभर विविध उपक्रम राबवत असते. त्यात गणेश उत्सव, ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात वारकऱ्यांसाठी अन्नदान, तसेच रक्तदान शिबिरे यांचा समावेश आहे. स्थानिकांमध्ये या उपक्रमांचे कौतुक होत असते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन विठ्ठल मदने यांनी केले. भक्तिमय वातावरण, सुंदर सजावट आणि शिस्तबद्ध आयोजनामुळे हडपसरमधील दत्तजयंती उत्सव यंदाही संस्मरणीय ठरला.




### अवैध दारू विक्री विरोधात विभागीय आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन

पुणे (आरंभ पर्व) : वैराग पोलीस स्टेशन हद्दीतील वैराग व हत्तीज परिसरात वाढत चाललेल्या अवैध दारूविक्रीविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर जिल्हा सरचिटणीस नागेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पुणे विभागीय आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. जवळगाव व हत्तीज परिसरातील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत या लढ्याला उत्स्फूर्त पाठिंबा दिला. या धरणे आंदोलनात स्वाती कदम, नंदा कांबळे, साक्षी चव्हाण, विमल दहिभाते, ज्योती उबाळे, लक्ष्मी जाधव, जयश्री पाटोळे, धनश्री राठोड, सुमन शिंदे, रूपाली चव्हाण, अश्विनी शिंदे, प्रियंका मोठे, रुकसाना शेख यांसह नागेश चव्हाण, बाबा मोठे, नवाज मुलानी, प्रथमेश झेंडे, सोमनाथ चव्हाण, किशोर बालके आणि संजय वाघमारे यांनी सक्रिय सहभाग घेतला. विशेषतः महिलांची उपस्थिती उल्लेखनीय होती. नागेश चव्हाण म्हणाले, "वैराग व हत्तीज परिसरातील अवैध दारूविक्रीमुळे तरुण पिढी बिघडत आहे. अनेक घरांमध्ये भांडणं, व्यसनाधीनता आणि सामाजिक समस्या वाढत आहेत. अनेक वेळा तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने आम्हाला आंदोलन करावे लागले. वैराग पोलीस स्टेशन यांना याबाबत निवेदन देऊनही तत्पुरती कार्यवाही करण्यात आली. त्यामुळे मुळे आम्ही विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे." चव्हाण यांनी प्रशासनासमोर पुढील मागण्या ठामपणे मांडल्या आहेत. अवैध दारूविक्रीला पाठबळ देणाऱ्या बीट अंमलदार व पोलीस पाटील यांच्यावर कठोर कारवाई करावी. वैराग–हत्तीज परिसर पूर्णपणे दारूमुक्त करण्यासाठी विशेष पथक नियुक्त करावे. नोटीस देऊनही पुन्हा अवैध दारू विक्री चालू झाल्यास सदर विक्रेत्यास मकोका कायद्याद्वारे कार्यवाही करावी.. महिला भगिनींचा विचार शासनाने करावा ही विनंती केली आहे. नागरिकांनी प्रशासनाला निवेदन देत सांगितले की, "ही जनहिताची लढाई आहे. आमच्या मागण्यांवर तातडीने कारवाई व्हावी."



सोपल गटाचा सूपडा साफ

# 'बळीराजा आघाडी'चा धडाकेबाज विजय

## सत्तेवरील शिक्कामोर्तब - १८ पैकी १८ जागा राऊत गटाच्या नावावर

"देवेंद्र फडणवीस साहेबांचे मार्गदर्शन, पारदर्शक कारभार, कार्यकर्त्यांची मेहनत आणि मतदारांचा विश्वास—यामुळेच हा ऐतिहासिक विजय शक्य झाला. शेतकऱ्यांच्या तोंडात सोन्याचा घास जावा, हा आमचा संकल्प आहे." — माजी आमदार राजेंद्र राऊत







**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखालील बळीराजा विकास आघाडीने अभूतपूर्व कामगिरी करत प्रतिस्पर्धी दिलीप सोपल यांच्या परिवर्तन आघाडीचा पूर्ण 'व्हाईट वॉश' केला आहे. यापूर्वीच व्यापारी मतदारसंघातील दोन जागांवर बिनविरोध विजय मिळवत मिळवलेली आघाडी आज मतमोजणीत 16 पैकी सर्व जागा जिंकत अधिक भक्कम झाली. एकूण 18-0 असा पराक्रम नोंदवत राऊत गटाने बाजार समितीवरील सत्ता पुन्हा आपल्या नावावर कायम ठेवली.

**मतमोजणी केंद्राबाहेर राऊत गटाचा जल्लोष :** आदित्य कृष्णा मंगल कार्यालयात सकाळी आठपासून मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर पहिल्याच फेरीत हमाल तोलार गटातून गजेंद्र मुकटे यांचा विजय जाहीर होताच राऊत समर्थकांमध्ये जल्लोष सुरू झाला. गुलाल, फटाके आणि घोषणांनी परिसर दणाणून गेला. "राजाभाऊ राऊतांचा विजय असो!" या घोषणा सतत घुमत राहिल्या.

**ग्रामपंचायत—सोसायटी मतदारसंघात एकतर्फी बाजी :** ग्रामपंचायत गटातील चारही जागांवर राऊत गटाचे उमेदवार मोठ्या फरकाने विजयी ठरले. अजित बारंगुळे, नेताजी घायतीडक यांनी 200 पेक्षा जास्त मतांनी, तर संजय माळी व रामेश्वर पाटील यांनीही निश्चिंत फरकाने मताधिक्य मिळवत विजय मिळवला.

सोसायटी मतदारसंघ ही खरी स्पर्धेची जागा ठरणार अशी अपेक्षा होती; मात्र येथेही राऊत गटाने वर्चस्व टिकवले. महिला गटात मनीषा ताकभाते (850) आणि सुमन पाटील (844) यांनी स्पष्ट मतांनी विजय संपादन केला.

**सर्वांचे लक्ष लागलेले 'खुल्या गटातील' थरारक निकाल :** खुल्या सात जागांच्या मतमोजणीत मात्र चुरस पाहायला मिळाली. मोठ्या प्रमाणावर बाद मते (76) आणि काटेकोर मतसंख्या असल्याने दोन्ही पॅनेलमध्ये धाकधूक कायम होती.

महत्त्वाच्या लढतीत राऊत गटाचे रविकांत साळुंखे यांनी सोपल गटाचे युवराज काटे यांच्यावर 26 मतांनी विजय मिळवत निकाल राऊत गटाकडे झुकवला. अभिजीत कापसे, बाबा गायकवाड , विजय गरड,प्रभाकर डमरे, सुरेश गुंड,यशवंत माने , विजय गरड यांनीही खुल्या गटात प्रभावी विजय मिळवत राऊत गटाचा आकडा 18 वर पोहोचवला.

**कुटुंबाचा भावनिक क्षण — वडील-पुत्रांच्या मिठीने भरला आनंद :** मतमोजणी संपताच रणवीर राऊत केंद्रातून बाहेर आले. बाहेर येताच त्यांनी आपल्या वडिलांना—माजी आमदार राजेंद्र राऊत—साष्टांग दंडवत घालून मिठी मारली. त्या क्षणी दोघांच्याही डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. विजयी उमेदवार आणि कार्यकर्त्यांनी त्यानंतर रणवीर व विजय राऊत यांना खांद्यावर घेऊन मिरवणुकीला सुरुवात केली.

### शेवटी मिरवणूक आणि विजयी जल्लोष

निकाल जाहीर होताच उपळाई रोडवरून शिवसृष्टीपर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. भगवंताचे दर्शन घेऊन शिवरायांना अभिवादन करत राऊत गटाने विजय साजरा केला. हा निकाल केवळ सत्ता टिकवण्याचा नाही, तर बार्शी तालुक्यात राऊत गटाचा प्रभाव अजूनही अगदी मजबुतीने टिकून असल्याची ठसठशीत नोंद आहे.





# अध्यक्षपदी सुरेशभाऊ मते

## पक्षात उत्साह – कार्यकर्त्यांमध्ये आनंदाची लाट

**धायरी/खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा काँग्रेस अध्यक्षपदी सुरेश मते यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली असून, या निवडीचे सर्व स्तरातून जोरदार स्वागत होत आहे. पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी आणि येणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही निवड महत्वाची ठरणार आहे.

पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीरंग चव्हाण पाटील यांच्या हस्ते निवडीचे पत्र त्यांना देण्यात आले. यावेळी काँग्रेस नेते माजी आमदार मोहनदादा जोशी, मिलिंद पोकळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते..



सुरेशभाऊ मते हे यापूर्वी बारामती लोकसभा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत होते. संघटन कौशल्य, लोकसंपर्क आणि पक्षनिष्ठा या गुणांमुळे त्यांना खडकवासला विधानसभा अध्यक्षपदी संधी मिळाली आहे. खडकवासला गावातील ज्येष्ठ नेते असून, या भूमीचा त्यांना असलेला राजकीय व सामाजिक वारसा नव्या जबाबदारीत निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

पदाधिकाऱ्यांनी सुरेश मते यांना मनःपूर्वक शुभेच्छा देत काँग्रेस पक्ष संघटनेत नवचैतन्य निर्माण होईल असा विश्वास व्यक्त केला.

कार्यकर्त्यांनी या निवडीचे स्वागत करत "खडकवासल्यात काँग्रेस पक्षाला नवी दिशा मिळेल" अशी भावना व्यक्त केली.

सुरेश मते यांनी बोलताना सांगितले की, "खडकवासल्यातील सर्व समाजघटकांना एकत्र घेऊन विकास आणि संघटन बळकटी हेच माझे ध्येय असेल. पक्षाने मला दिलेल्या विश्वासाला न्याय देईन. आगामी पुणे महानगरपालिकेसाठी कार्यकर्त्यांना संधी मिळावी यासाठी ही प्रयत्न करणार आहे" खडकवासला विधानसभा काँग्रेसमध्ये या निवडीमुळे उत्साहाचे वातावरण असून, पुढील राजकीय घडामोडींमध्ये सुरेश मते यांची भूमिका महत्वाची ठरणार आहे.

### पत्रकार विशाल भालेराव यांचे चुलते मधुकर भालेराव यांचे निधन

**मालखेड (दै. आरंभ पर्व)**

पत्रकार विशाल भालेराव यांचे चुलते तसेच समाजात शांत, मनमिळाऊ आणि कष्टाळू म्हणून ओळखले जाणारे मधुकर (भाऊ) चांगदेव भालेराव (वय ७५) यांचे सोमवार, दि. ८ रोजी सकाळी ८:30 वाजता आजारपणाने दुःखद निधन झाले. मधुकर भालेराव हे त्यांच्या परिसरात सुस्वभावी, समाजघटकांना मदतीला धावून जाणारे आणि नातेसंबंधात जिव्हाळा जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वत्र आदराने पाहिले जात. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावत होती. उपचार सुरू असताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या मृत्यूची बातमी समजताच गावातील नागरिक, नातेवाईक व मित्रपरिवारात शोककळा पसरली. घरातील ज्येष्ठ आधारवड हरवल्याची भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली. त्यांच्या मागे मुलगा, पुतणे, नातू, सुना व पत्नी असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अकस्मात जाण्याने संपूर्ण घराण्यावर दुःखाचा पर्वत कोसळला आहे. त्यांच्या पार्थिवावर आज मालखेड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दि. १४ रोजी रविवारी मालखेड येथील राहत्या घरी पुन्यामोदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



• परिवार, नातेवाईकांत शोककळा